# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## महाराष्ट्रात आता ई-कॅबिनेट, महामंडळांसाठी नवा प्लॅटफॉर्म

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ मुंबई**

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत मंत्रालय सुरक्षेत वाढ, सरकारी कामांतील पारदर्शकता, कर्मचाऱ्यांचे पगार यासह विविध बाबतीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. आधार हा जसा एका व्यक्तीचा युनिक आयडी असतो, तसाच युनिक आयडी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी तयार करण्याचा निर्णय आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्री उपस्थित होते.

अनेक विभाग एकाच ठिकाणी एकाच प्रकारची विकास कामे करतात. त्यातून तीच ती कामे होऊन कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. आधार क्रमांकामुळे जसे अनेक बोगस लाभार्थी आणि तीच ती नावे वगळली गेली, तसेच या निर्णयामुळे त्याच त्या विकास कामांची पुनरावृत्ती टाळता येणार आहे. यातून विकास कामांचे सुयोग्य नियोजन व्हावे आणि त्यात सुसूत्रता असावी, यासाठी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पाला युनिक आयडी असावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे कोणत्या भागात, कोणत्या कामाचे नियोजन केले आहे आणि नेमके कोठे, कोणत्या प्रकल्पाची गरज आहे, हे एकत्रितपणे एका डॅशबोर्डवर उपलब्ध असेल. त्यामुळे नेमक्या कोणत्या प्रकल्पाची कुठे गरज आहे, हे सुद्धा सहजतेने कळेल.




यातून संतुलित विकास साधता येईल आणि निधी, श्रमशक्ती याचा सुयोग्य वापर होईल. ही माहिती पीएम गतिशक्ती पोर्टल, ग्रामविकास पोर्टल, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) इत्यादींशी एकिकृत असेल. याचे प्रारूप निश्चित करण्यासाठी एक समिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निश्चित केली. यात नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, प्रधान सचिव (व्यय) सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा समावेश आहे. या समितीने आपला अहवाल मंत्रिमंडळाला सादर करायचा आहे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**महामंडळांबाबत काय निर्णय घेतला?**

राज्यातील सर्व समाज विकास महामंडळे एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचा निर्णय सुद्धा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यामुळे सर्व विकास महामंडळाच्या सर्व योजना एका ठिकाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे 'इज ऑफ लिव्हिंग'चा उद्देश साध्य होणार आहे, शिवाय सर्व समाजघटकांना एकाच ठिकाणी सर्व योजना आणि त्याचे लाभ घेता येणार आहेत. याचे प्रारूप निश्चित करण्यासाठी सुद्धा ४ अधिकाऱ्यांची समिती गठित करण्यात आली आहे. यात नगरविकास-१ चे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता, उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी, ग्रामविकास सचिव विजय वाघमारे, पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांचा समावेश आहे. यांनाही राज्य मंत्रिमंडळाला आपला अहवाल सादर करायचा आहे.

**ई-कॅबिनेटची संकल्पना काय?**

'ई ऑफिस'च्या धर्तीवर 'ई-कॅबिनेट'चे सूतोवाच करण्यात आले. राज्य मंत्रिमंडळाचा संपूर्ण मसुदा हा टॅबच्या माध्यमातून हाताळण्यात यावा, यातून कागदाची बचत होऊन पर्यावरण जपले जाईल, ही त्यामागची भावना आहे.

**शेतकऱ्यांना दिलासा**


महाराष्ट्र सरकार ४ हजार ८४९ एकर जमीन शेतकऱ्यांना परत करणार असून त्याचा राज्यातील तब्बल ९६३ शेतकऱ्यांना होणार फायदा होणार आहे.

## लाडकी बहीण योजनेच्या सगळ्या लाभार्थ्यांची फेरतपासणी होणार

### आदिती तटकरेंनी दिली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

लाडकी बहीण योजनेमुळे देशभरातील लाखो महिलांना मोठा फायदा झाला. या योजनेंतर्गत महिलांच्या खात्यावर दर महिन्याला १५०० रुपये येत आहेत. या योजनेचा लाभ घेणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची फेरतपासणी होणार आहे. यासंदर्भात आतापर्यंत फक्त चर्चा सुरू होती, मात्र आता फेरतपासणी होणार असल्याचं अदिती तटकरे यांनी स्वत: सांगितलं आहे.



लाडकी बहीणच्या योजनेचा गैरवापर करून ज्यांनी पैसे घेतले, अशा तक्रारी ज्या भागांमधून आल्या तिथे, फेरतपासणी होतच आहे. मात्र आता सगळ्यांचीच फेरतपासणी होणार असल्याचं समोर आलं आहे. इतकंच नाही अद्यापही काही अर्जांची छाननी होण्याचं काम बाकी आहे. या अर्जांची छाननी देखील काटेकोर पद्धतीनं होणार आहे.अडीच लाखहून अधिक उत्पन्न असलेल्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे आता फेरतपासणीत जर अशा महिला आढळल्या तर त्यांना यानंतर खात्यावर पैसे येणार नाहीत अशी माहिती त्यांनी स्वत: दिली आहे.

## नववर्षातील पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत निर्णयांचा धडाका; शासकीय कर्मचाऱ्यांचे पगार मुंबई बँकेतून होणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारासह पड जमिनीसंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत वैयक्तिक खाते उघडण्यास तसंच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीस प्राधिकृत करण्यास मंजुरी आणि त्यासाठीचे निकष शिथिल करण्यात आले आहेत.

महसूल विभागाबाबत आजच्या मंत्रिमंडळत बैठकीत निर्णय घेण्यात आला असून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-२२० मध्ये आकारी पड जमिनीच्या संदर्भात असलेल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीत अन्य कोणते निर्णय?**

महाराष्ट्र सरकार ४ हजार ८४९ एकर जमीन शेतकऱ्यांना परत करणार असून त्याचा राज्यातील तब्बल ९६३ शेतकऱ्यांना होणार फायदा होणार आहे. राज्यातील ९६३ शेतकऱ्यांच्या ४ हजार ८४९ एकर जमिनी शासन जमा झाल्या होत्या. आज मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळात निर्णय घेत संपूर्ण ९६३ शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या मालकीच्या होणार असल्याचं स्पष्ट केलं असून रेडीरकनरच्या २५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागणार आहे.

**बैठकीला अजितदादांची अनुपस्थिती**

आज पार पडलेल्या पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री दत्तात्रय भरणे हे आले नाहीत. परंतु मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे चर्चेत आले आहेत. त्यामुळे मुंडे उपस्थित राहतील की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. पण, मुंडे या बैठकीला आले होते. यावेळी बैठकीत फडणवीस यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा संपूर्ण आढावा घेतला. अजितदादा सध्या परदेशात असल्याने ते बैठकीला आले नसल्याचे सांगितले जात आहे. तर, दुसरीकडे संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर अद्याप अजित पवारांनी कोणत्याही प्रकारचे भाष्य केलेले नाही.

## संतोष देशमुख प्रकरण फास्टट्रॅकला चालवा, दोषींना फाशी द्या; धनंजय मुंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी दिवसेंदिवस राजकारण तापताना पाहायला मिळत आहे. या प्रकरणातील प्रमुख संशयित वाल्मीक कराड तपास यंत्रणेला शरण आल्यानंतर या प्रकरणाच्या तपासाला वेग आल्याचे बोलले जात आहे. यातच वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे यांचा संबंध जोडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. या प्रकरणी विरोधक चांगलेच आक्रमक झाले असताना धनंजय मुंडे यांनी याबाबत स्पष्ट शब्दांत भूमिका व्यक्त केली आहे.



महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटप झाल्यानंतरची पहिलीच मंत्रिमंडळ बैठक होती. मंत्रालयात झालेल्या या बैठकीला अनेक मंत्री उपस्थित होते. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित नव्हते. यानंतर पत्रकारांशी बोलताना धनंजय मुंडे यांनी बीड प्रकरणी आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली.

पत्रकारांशी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, छोटा आका, मोठा आका, कुणाचा एन्काउंटर अशा गोष्टी प्रथमच ऐकत आहे. सीआयडी अतिशय व्यवस्थितपणे तपास करते. दिवंगत संतोष देशमुख यांची हत्या ज्यांनी केली आहे, त्यांना फास्ट्रॅक कोर्टात नेऊन फासावर चढवणे हा आमचा महत्त्वाचा उद्देश आहे. बाकी कुठल्या चर्चांना अर्थ नाही. हे प्रकरण फास्टट्रॅकमध्ये नेले पाहिजे, ही मागणी मीच सर्वप्रथम केली होती. नागपूरच्या अधिवेशनात ही मागणी केली होती. यातील आरोपींना लवकरात लवकर पकडून चार्जशीट दाखल करावी. फास्टट्रॅक कोर्टात या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, असे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. या तपासात कोणाचाही प्रभाव पडू नये, यासाठी सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन चौकशी, अशा तीनही प्रकरच्या चौकशा सुरू आहेत. ही घटना दुर्दैवी असून, यात जे कुणी दोषी असतील, हीच भूमिका सर्वपक्षीय एकवटलेल्या आमदारांची आणि अन्य सर्वांची आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. दरम्यान, पालकमंत्रीपदावरून महायुतीत रस्सीखेच सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. पालकमंत्रीपदाबाबत अजित पवार निर्णय घेतील, असे धनंजय मुंडे यांनी सांगितले.

## डी गुकेश, मनू भाकरसह चार खेळाडूंना 'खेलरत्न' पुरस्कार जाहीर; महाराष्ट्राच्या स्वप्नील कुसळेचाही सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये देशासाठी दोन कांस्यपदक जिंकणारी नेमबाज मनू भाकरला खेलरत्न पुरस्कार देण्यात येणार आहे. यासोबतच विश्वविजेता बुद्धिबळपटू डी गुकेशलाही खेलरत्नने सन्मानित करण्यात येणार आहे. मनू भाकरच्या नावाची खेलरत्न पुरस्कारासाठी निवड झाली नसल्याती बातमी येत होती परंतु त्या सर्व बातम्या फेटाळून लावल्या असून आता



या दिग्गज खेळाडूला देशातील सर्वात मोठा क्रीडा पुरस्कार मिळणार आहे. मनू भाकरने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल आणि २५ मीटर एअर पिस्तूलमध्ये कांस्यपदक जिंकले होते. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी ती पहिली भारतीय आहे.

बुद्धिबळपटू डी गुकेशलाही खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. गुकेशने गेल्या महिन्यात १२ डिसेंबर रोजी बुद्धिबळाचा विश्वविजेता होण्याचा मान मिळवला होता. सिंगापूर येथे झालेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये गुकेशने चीनच्या डिंग लिरेनचा पराभव करून विजेतेपद पटकावले. वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी तो विश्वविजेता बनला, हा विश्वविक्रम आहे.

हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता प्रवीण कुमार यांनाही खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले. प्रवीण कुमारने उंच उडी ढ६४ स्पर्धेत देशासाठी सुवर्णपदक जिंकले होते. प्रवीण कुमारने आशियाई विक्रम मोडीत काढत ही कामगिरी केली होती. क्रीडा मंत्रालय ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करेल, त्यापैकी १७ पॅरा थलीट आहेत. खेलरत्न पुरस्कार प्रदान सोहळा हा १७ जानेवारीला रंगणार आहे.

## मुंडेंच्या परळीत पोलीसप्रमुख, तहसीलदार अन् बीडीओ सुद्धा वंजारीच; अंजली दमानियांनी शेअर केली यादीच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ मुंबई**

बीडमधील सरपंच हत्याप्रकरणानंतर बीडमध्ये (इशशव) राजकीय नेत्यांकडून होत असलेल्या सत्तेच्या गैरवापराबाबत विरोधकांनी आवाज उठवला आहे. आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यात छोटे आका व मोठे आका यांची दहशत असल्याचे सांगत येथील पोलीस व प्रशासनात सगळे ह्या नेत्यांचेच अधिकारी असल्याचं म्हटलं होतं. तर, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया (-पक्षरश्रळ वरारपळर) यांनी देखील हे प्रकरण सुरुवातीपासून लाऊन धरलं आहे. याप्रकरणातील आरोपींना अटक करुन कडक कारवाई करावी, या मागणीसह बीडमध्ये वाल्मिक कराडची असलेली दहशत सरकारने मोडून काढावी, अशी मागणीही त्यांनी केली होती. आता, बीडमध्ये एका विशिष्ट समाजाचेच अधिकारी का आहेत, असा सवाल उपस्थित करत अंजली दमानिया यांनी परळीतील तहसीलदार, पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी यांची नावेच जाहीर केली आहे. त्यामुळे, आता पुन्हा एकदा बीडमध्ये जातीय समीकरण कसं हाताळलं जातं हे समोर आलंय.

अंजली दमानिया यांनी ट्विट करुन बीडमधील अधिकारी वर्ग हा मंत्री धनंजय मुंडेंच्या मर्जीतील व त्यांच्याच समजाचा असल्याचं म्हटंल आहे.




''वंजारी समाजात भगवान बाबांसारखे विचारवंत होते ज्यांनी ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. भक्तिमार्ग, कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांचा समन्वय त्यांनी साधला. त्यांचा नावाचा आणि कर्तुत्वाचा दुरुपयोग करुन काही राजकीय नेते आणि वाल्मिक कराड सारखी माणसं, या समजाला बदनाम करत आहेत. धनंजय मुंडे यांनी आपल्या मर्जीतील याच समाजातील माणसं परळी येथे सगळ्या पदांवर घेतली आहेत, माझा आक्षेप ह्यावर नक्कीच आहे, असे म्हणत दमानिया यांनी परळीतील अधिकाऱ्यांची नावासह यादीच शेअर केली आहे.

सगळ्या वंजारी समाजातील लोकांनी जाग व्हायला हवं आणि ही माणसे फक्त समाजाचा वापर करत आहेत हे समजून घ्यायला हावं. मुद्दा समजावण्यासाठी मी पूर्ण यादी देत आहे, असेही त्यांनी म्हटलं. तसेच, राज्य शासनाने याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, असेही त्यांनी ट्विटमधून म्हटलं आहे.

दरम्यान, हा समाज वाईट आहे, असे माझे म्हणणे मुळीच नाही. मात्र, त्यांचा फक्त वापर होतोय हे ह्यातलं सत्य आहे, असेही अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे.

**परळीतील अधिकाऱ्यांची पद व नावे**

परळी शहर पोलीस स्टेशन प्रमुख - रवी सानप
परळी ग्रामीण पोलीस स्टेशन प्रमुख - सुरेश चाटे
परळी तहसीलदार - श्री. व्यंकटेश मुंडे
परळी गटविकास अधिकारी - विठ्ठल नागरगोजे
परळी सह गटविकास अधिकारी - एस एस मुंडे

## संपादकीय ......

# नववर्षाचं मनमोकळं स्वागत..!

एक वर्ष संपून नवं वर्ष आता सुरू झालं आहे. मावळत्या वर्षातील क्षणांना निरोप देऊन नव्या वर्षाच्या स्वागताला कसं सिद्ध व्हायचं, असा प्रश्न पडला असेल ना? निसर्ग ज्याप्रमाणे एका ऋतूला निरोप देऊन नव्या ऋतूला आपल्यात सामावून घेतो, तसंच आपल्या मनालाही तयार करता येईल. जुन्या गोष्टींमध्ये अडकलेल्या मनाला सावरायला हवं.

२०२४ हे वर्ष आता संपले आहे आणि आपण २०२५ मध्ये पोहोचलो आहोत. अशावेळी सरत्या दिवसांना निरोप आणि येणार्या दिवसांचं स्वागत! काय सोडायचं जाणार्या दिवसांचं आणि कसं स्वागत करायचं येणार्या दिवसांचं? कोणाकडून शिकायचं स्वागत कसं करायचं ते? पाश्चात्त्यांसारखं नाचगाणं करून, केक कापून, दूरदर्शनवर दाखवण्यात येणारे कार्यक्रम पाहून की एखाद्या डिस्को, पबमध्ये धमाल करून? कारण हे आता जुनं झालंय. अशी कित्येक वर्षे गेली असतील, असंच स्वागत आपण करत आलो आहोत नवीन वर्षाचं उसनं अवसान आणून. त्यांनी तसं केलं म्हणून आम्ही असंच करणार, असं म्हणत. यावर्षी जरा हटके करावं, असं वाटतंय.

'जुने जाऊ द्या मरणालागून' म्हणत परत परत तेच का करायचं? 'नव्या जगाचे, नव्या युगाचे पाईक आम्ही, नववर्षाचे करू स्वागत करूया नव्या तर्हेनं.' तर ही नवी तर्हा कशी बरं असावी? याच विचारानं १५ डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंतचे दिवस व्यापून राहतात की काय, असा प्रश्न मनाला डाचत होता; मग सहजच एक विचार आला, निसर्गातून का नाही शिकायचं, का नाही त्याचं अनुकरण करायचं? इतका जवळचा जिवलग. तो तर नेहमीच तयार असतो ना आपल्याला शिकवायला? न बोलता, अबोल राहून तो आपल्यासमोर हजारो गोष्टी तयार ठेवतो, नानाविध पत्राणि सर्मपयामि म्हणत अख्खी तयारी करून ठेवतो. कसं आणि किती घ्यायचं ते प्रत्येकानं आपल्या प्रवृत्तीनुसार घ्यावं. तो आग्रह करणार नाही. पाठी लागणार नाही. नाही घेतलं तर हिरमुसणारही नाही. त्याची स्वागत करण्याची आणि निरोप देण्याची पद्धत फार वेगळी आहे. पानगळीला निरोप देताना तो खंतावत नाही की, टोकावर उगवलेल्या कोवळ्या जीवनदायी किसल्यानं हुरळत नाही. ही त्याची तटस्थता विरागी नाही, तर साक्षीवृत्तीनं बघणारी, निरखणारी आहे. तसंच आपणही नव्याचं स्वागत करताना आणि सरत्या वर्षाला निरोप देताना राहावं का? हा प्रश्न ज्याचा त्याचा ज्यानं त्यानं आपापल्या पद्धतीनं सोडवावा. मी तुमच्या समोर हा विचारदेखील याच हेतूनं मांडला आहे.

कोणत्याही सोहळ्याच्या स्वागतासाठी आपण तयारी सुरू करताना प्रथम आवराआवरी करतो. आधी घराची आणि मग स्वत:ची. स्वत:ची तयारी दोन प्रकारची असते. एक मनाची आणि दुसरी शरीराची! घर आवरत असताना नको असणार्या वस्तू आपण एका ठिकाणी जमा करतो. अगदीच नकोशा असलेल्या चक्क फेकून देतो. घराची जाळंजळमटं झाडून काढतो. कपाटं आवरतो. नको असणारी कागदपत्रं जाळून टाकतो. घरातला हा काडीकचरा साफ करतो. आता घर स्वच्छ दिसू लागतं. घरात येणारा सूर्यप्रकाश अधिकच उजळ आणि मोकळा वाटतो. त्याच्या प्रकाशानं घराचा कोपरान्कोपरा न्हाऊन निघतो; मग आपण वळतो जमा झालेल्या आणि नकोशा वस्तूंकडे. एकवार पुन्हा छाननी करतो. यातील काही पुढे-मागे उपयोगात येतील का, याचा दहादा विचार करून त्या पूर्णपणे नाहीशा करतो. नक्कीच तो मोह, असा आव आणत त्या वस्तू फेकून देतो. कारण, त्या कोणाच्याच उपयोगाच्या उरलेल्या नसतात. काही काळ त्या आपल्या आयुष्याच्या अविभाज्य असतात. त्यावाचून आपलं खूप काही अडलेलं असतं; पण काळाच्या प्रवाहात पुढे जाऊन त्या निकामी ठरतात. उपयोगशून्य ठरतात; मग त्या सोडून देणंच योग्य नाही का? घर आवरून झालं की, काही जुन्या गोष्टीमध्ये अडकलेल्या मनाला आवरायला घ्यावं ! तुम्ही म्हणाल मन आवरणं ही काय भानगड? असं काही असतं का? तर याचं उत्तर होय! नववर्षाच्या स्वागताला घरासोबत यावर्षी मन आवरून बघा! कल्पना नवी नाही. जुनीच आहे. कोणी आपल्या घरी येणार म्हटलं की, आपण जागेसोबत मनाला काही सूचना करत असतो. हो ना? बघा आता तुम्हाला खरंच मनमोकळेपणानं, स्वच्छ मनानं, स्वच्छ घरानं नवीन वर्षाचं स्वागत करताना होणारा आनंद निश्चितच अवर्णनीय राहील.




## पित्ताशयात खडे तयार होण्याची कारणे काय? जाणून घ्या लक्षणे आणि उपचार

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक-** पित्त मूत्राशय हा तुमच्या यकृताखाली एक लहान नाशपातीच्या आकाराचा अवयव आहे जो पित्त साठवतो आणि सोडतो. पित्ताचे खडे हे किडनी स्टोनपेक्षा वेगळे असतात. कारण, ते कॅल्शियमऐवजी कोलेस्टेरॉलपासून बनवले जाते. त्यामुळे त्याची लक्षणेही वेगळी असतात. त्याला पित्ताशयाचा खडा असेही म्हणतात. पित्ताच्या आत कोलेस्टेरॉल आणि बिलीरुबिनचे प्रमाण जास्त असते आणि पित्त क्षारांचे प्रमाण कमी असते तेव्हा पित्ताशयामध्ये पित्ताशयात खडे तयार होतात. तसे, हा अवयव स्वत:च या गोष्टी काढून टाकतो, परंतु जेव्हा ते तेथे जमा होतात तेव्हा ते दगड बनते.



पित्त हे तुमचे यकृत बनवणारे द्रव आहे जे तुम्ही खात असलेल्या अन्नातील चरबी पचवण्यास मदत करते. पित्ताशयातील खडे हे घन कण आहेत जे पित्ताशयामध्ये तयार होतात, यकृताच्या खाली स्थित एक लहान अवयव. पित्तामध्ये कोलेस्टेरॉल तसेच इतर अनेक रासायनिक द्रव्ये असतात. या सर्वांमध्ये असमतोल निर्माण झाल्यास पित्ताशयात खडे तयार होतात असे मानले जाते. बहुतेक वेळा पित्तामधील कोलेस्टेरॉलची पातळी खूप वाढते आणि या अतिरिक्त कोलेस्टेरॉलचे खडे तयार होतात. हे खडे वेगवेगळ्या आकाराचे असू शकतात; वाळूच्या दाण्यापासून गोल्फ बॉलच्या आकारापर्यंत. याबाबत डॉ .अपर्णा गोविल भास्कर (सल्लागार बॅरिएट्रिक आणि लॅपरोस्कोपिक सर्जन, अपोलो आणि नमाहा हॉस्पिटल्स, मुंबई ) यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

पित्ताशयातील खड्यांची लक्षणे

पोटात तीव्र वेदना. या वेदना पोटातून उजव्या खांद्याकडे किंवा पाठीकडे जातात. जेवल्यानंतर किंवा काही खाल्ल्यानंतर विशेषत: चरबीयुक्त (तेल-तूप असणारे) पदार्थ खाल्ल्यानंतर या वेदना वाढतात. पोटात टोचल्यासारखे किंवा कळ येऊन दुखते किंवा मध्यम तीव्रतेचे पण सतत दुखते. दीर्घ श्वास घेतल्यावर वेदना वाढतात. छातीत दुखते. छातीत जळजळ होते, अपचन पोटात वात धरतो. पोट सतत फुगल्यासारखे वाटते. मळमळ, उलट्या, ताप येतो. पोटात विशेषत: वरच्या भागात उजव्या बाजूला हात लावल्यावर दुखणे. शौचाचा रंग फिका किंवा मातकट दिसतो.

अचानक आणि तीव्र वेदना: हे विशेषत: वरच्या उजव्या ओटीपोटात किंवा स्तनाच्या हाडाच्या खाली तसेच पोटाच्या मध्यभागी होते. वेदना काही मिनिटांपासून कित्येक तासांपर्यंत टिकतात. पाठदुखी: या वेदना उजव्या खांद्यावर किंवा पाठीसंबंधीत असू शकतात. मळमळ आणि उलट्या: अनेकदा पोटदुखीसोबत असतात ही लक्षणे जाणवतात. कावीळ: त्वचा आणि डोळे पिवळसर होऊ शकतात. ताप आणि थंडी वाजून येणे: हे संक्रमण झाल्याचे सूचित करू शकतात, ज्यासाठी त्वरित वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे.

**पित्ताशयातील खड्यांची कारणे**

अतिरिक्त कोलेस्टेरॉल: जेव्हा यकृत हे पित्त विरघळू शकते त्यापेक्षा जास्त कोलेस्टेरॉल उत्सर्जित करते, तेव्हा अतिरिक्त कोलेस्ट्रॉलचे क्रिस्टल्स आणि पुढे जाऊन खडे बनू शकतात. बिलीरुबिन प्रमाण अधिक असणे: लिव्हर सिऱ्होसिस, पित्त मार्गाविषयक संक्रमण आणि काही रक्त विकार यांसारख्या परिस्थितींमुळे यकृत खूप जास्त प्रमाणात बिलीरुबिन तयार करते, ज्यामुळे पित्ताचे खडे तयार होतात.

**जोखमीचे घटक कोणते?**

वय: ४० पेक्षा जास्त वय असलेल्या लोकांना याचा जास्त धोका असतो. लिंग: पुरुषांपेक्षा स्त्रियांना पित्ताशयातील खड्यांची शक्यता अधिक असते. वजन: लठ्ठपणा हा एक जोखमीचा घटक ठरत आहे. आहार: जास्त चरबीयुक्त आहार, आहारातील उच्च कोलेस्टेरॉल तसेच कमी फायबरयुक्त आहार हा पित्ताशयातील खड्यांच्या निर्मितीस कारणीभूत ठरतो. कौटुंबिक इतिहास: कौटुंबिक इतिहासामुळे पित्ताशयाच्या खड्यांचा धोका वाढतो. वैद्यकीय परिस्थिती: मधुमेह, यकृताचे आजार आणि काही रक्त विकार हे पित्ताशयातील खडे तयार होण्यास कारणीभूत ठरु शकतात.

**उपचार काय कराल?**

औषधोपचार: कोलेस्टेरॉलचे खडे विरघळण्यासाठी काही ठराविक औषधे (णीीवशुेलहेश्रळल रलळव) लिहून दिली जातात, मात्र हे दरवेळी प्रभावी ठरतीलच असे नाही. शस्त्रक्रिया: लक्षणात्मक पित्ताशयाच्या खड्यांसाठी सर्वात सामान्य उपचार म्हणजे पित्ताशयाची शस्त्रक्रिया, पित्ताशय काढून टाकणे. हे सहसा कमीतकमी हल्ल्याच्या लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेद्वारे केले जाते.

# मशरूम शेतीत येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय, जाणून घ्या सविस्तर

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

मशरूम लागवडीत समस्या नक्कीच आहेत, परंतु योग्य तंत्रज्ञान, योग्य प्रशिक्षण आणि योग्य संसाधनांचा वापर करून या समस्या सोडवता येतात. शेतकऱ्यांनी जागरूकता आणि व्यवस्थापन कौशल्ये घेऊन पुढे जाण्याची गरज आहे. या समस्यांवर योग्य वेळी लक्ष दिल्यास मशरूम लागवडीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न तर वाढेलच शिवाय कृषी क्षेत्रातही महत्त्वाचे योगदान मिळेल.

मशरूम उत्पादन हे आज शेतीचे महत्त्वाचे आणि फायदेशीर क्षेत्र बनले आहे. हे कमी जागेत आणि कमीत कमी गुंतवणुकीत चांगले उत्पन्न देऊ शकते. मात्र, यामध्ये शेतकऱ्यांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधून मशरूमचे उत्पादन वाढवता येते.

**दर्जेदार स्पॉँनचा अभाव**

**समस्या:** मशरूम उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या बियांची (स्पॉँन) गुणवत्ता महत्त्वाची आहे. अनेक वेळा शेतकरी निकृष्ट दर्जाचे बियाणे वापरतात, त्यामुळे उत्पादनावर परिणाम होतो.


उपाय : प्रमाणित संस्थांकडून बियाणे खरेदी करा. बियाणे खरेदी करण्यापूर्वी तपासून खरेदी करा, जर शक्य असेल तर, स्पॉँन उत्पादनासाठी स्वत: प्रशिक्षण घेऊन त्यावर काम करा.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**२. पर्यावरणीय परिस्थितीचे व्यवस्थापन**

**समस्या** : मशरूम लागवडीसाठी तापमान, आर्द्रता आणि हवेशीर वातावरण यांसारख्या पर्यावरणीय घटकांचे अचूक नियंत्रण आवश्यक आहे. त्यांचे योग्य व्यवस्थापन न केल्यास उत्पादनात घट होऊ शकते.

थर्मल इन्सुलेशनसह मशरूम कक्ष तयार करा. आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी पाण्याची फवारणी वापरा. तापमान नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करा.




**३. रोग आणि कीड व्यवस्थापन-** समस्या : मशरूम शेतीत बुरशीजन्य रोग, जिवाणू संक्रमण आणि किडींचे आक्रमण झाल्यास उत्पादनावर परिणाम होऊ शकतो.

**उपाय** : ज्या खोलीत मशरूमचे उत्पादन घेत आहेत, ते ठिकाण स्वच्छ राहील, याची काळजी घ्या. रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी योग्य हवेशीर वातावरण ठेवा.

**४. कच्च्या मालाची अनुपलब्धता**

**समस्या** : मशरूम उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाचा अभाव, जसे की गव्हाचा कोंडा, लाकूड भुसा आणि इतर साहित्य. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेले साहित्य वापरा. कच्चा माल कसा साठवता येईल याचे नियोजन करा.

**५. बाजार आणि विपणन**

**समस्या- समस्या** : मशरूम उत्पादकांना अनेकदा त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. शिवाय मार्केटिंगअभावी विक्री करताना अडचणी येण्याची शक्यता असते.

**उपाय** : स्थानिक बाजारपेठा आणि हॉटेल्सशी संपर्क वाढवा. मशरूमपासून उत्पादने तयार करा, जसे की लोणचे, सूप आणि पावडर. हे देखील विक्री करता येतील.

**६. भांडवलाची अडचण**

**समस्या** : मशरूम लागवडीसाठी प्रारंभिक गुंतवणूक आणि कालांतराने भांडवल आवश्यक आहे, जे लहान शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक असू शकते.

उपाय : सरकारी योजनांचा लाभ घ्या आणि बँकांकडून कृषी कर्ज मिळवा.

**७. तांत्रिक ज्ञानाचा अभाव**

**समस्या** : अनेक शेतकऱ्यांना मशरूम उत्पादनाचे प्रगत तंत्र आणि व्यवस्थापन पद्धती अवगत नाहीत.

**उपाय** : कृषी विभागाच्या प्रशिक्षण आणि कार्यशाळांना उपस्थित राहा. कृषी विज्ञान केंद्र (घतघ) आणि कृषी विद्यापीठे, खउ-ठ च्या फलोत्पादन आधारित संस्थांशी संपर्क साधा. मशरूम उत्पादनावर आधारित पुस्तकांचा अभ्यास करा.

**८. स्टोरेज आणि वाहतूक समस्या**

**समस्या** : मशरूम लवकर खराब होतात. त्यामुळे अनेकदा साठवणूक आणि वाहतुकीच्या सुविधांअभावी ही समस्या आणखी वाढते.

**उपाय** : कोल्ड स्टोरेज सुविधा वापरा. योग्य वेळी प्रक्रिया करून इतर पदार्थ बनवता येतील. शिवाय वाहतूक करताना योग्य पॅकिंग करा.

# प्रजासत्ताक दिन परेड आणि बीटिंग रिट्रीटसाठी तिकिटांची विक्री आजपासून



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नवी दिल्ली -** लक्ष द्या! प्रजासत्ताक दिन परेड आणि बीटिंग रिट्रीट सोहळ्यासाठी तिकिटांची विक्री गुरुवारपासून ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने सुरू होईल. ही प्रवेश तिकिटे ऑनलाइन प्लॅटफॉर्म किंवा नियुक्त तिकीट काउंटरद्वारे खरेदी करता येतील, असे संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. या कार्यक्रमांचे साक्षीदार होण्यास इच्छुक असलेले लोक ऑनलाइन किंवा संपूर्ण दिल्लीतील नियुक्त काउंटरवरून तिकिटे खरेदी करू शकतात.२६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी तिकीटाची किंमत २० आणि १०० रुपयांपासून सुरू होते, तर २८ जानेवारीला होणाऱ्या बीटिंग रिट्रीट रिहर्सलची तिकिटे २० रुपयांपासून उपलब्ध असतील.

२६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी तिकीटाची किंमत २० आणि १०० रुपयांपासून सुरू होते, तर २८ जानेवारीला होणाऱ्या बीटिंग रिट्रीट रिहर्सलची तिकिटे २० रुपयांपासून उपलब्ध असतील. २९ जानेवारीला होणाऱ्या बीटिंग रिट्रीट सोहळ्यासाठी तिकीट येथे उपलब्ध असतील. १०० रुपये. सामान्य जनतेने लक्षात ठेवावे की ११ जानेवारीपर्यंत तिकिट विक्री सुरू राहील, जोपर्यंत दैनिक कोटा संपत नाही.सामान्य लोक अधिकृत वेबसाइट रराररपीीरप.ोव.सीीं.ळप किंवा 'आममंत्रण' मोबाइल पद्वारे तिकीट खरेदी करू शकतात, जे मोबाइल सेवा प स्टोअरवरून डाउनलोड केले जाऊ शकतात. खरेदी खरेदीच्या उद्देशाने पसाठी टठ कोड अधिकृत प्लॅटफॉर्मवर देखील उपलब्ध आहे.

दिल्लीतील सेना भवन (गेट क्रमांक २), शास्त्री भवन (गेट क्रमांक ३ जवळ), जंतरमंतर (मुख्य गेट), प्रगती मैदान (गेट क्रमांक १) आणि राजीव चौक या पाच ठिकाणीही सर्वसामान्य जनता तिकीट खरेदी करू शकतात. मेट्रो स्टेशन (गेट क्र. ७ आणि ८). लोक २ जानेवारी ते ११ जानेवारी या कालावधीत सकाळी १० ते दुपारी १ आणि दुपारी २ ते ४:३० या वेळेत या काउंटरवर ही तिकिटे खरेदी करू शकतात.तिकीट खरेदी करण्यासाठी आणि समारंभांना उपस्थित राहण्यासाठी आधार, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट किंवा सरकारने जारी केलेले कोणतेही कार्ड यासारखे वैध फोटो आयडी आवश्यक आहे.

# एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी भारतीय वायुसेनेच्या वेस्टर्न एअर कमांडची जबाबदारी स्वीकारली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नवी दिल्ली,-** एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी ०१ जानेवारी २०२५ रोजी भारतीय हवाई दलाच्या वेस्टर्न एअर कमांडची कमान स्वीकारली.

एअर मार्शलची भारतीय हवाई दलात ०६ डिसेंबर १९८६ रोजी लढाऊ वैमानिक म्हणून नियुक्ती करण्यात आली. ते राष्ट्रीय संरक्षण अकादमी पुणे, एअर फोर्स टेस्ट पायलट स्कूल, बंगलोर, एअर कमांड अँड स्टाफ कॉलेज, यूएसए आणि रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीजचे माजी विद्यार्थी आहेत. , यूके. एक फायटर कॉम्बॅट लीडर आणि प्रायोगिक चाचणी पायलट, एअर मार्शल मिश्रा यांना ३००० तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव आहे.

३८ वर्षांच्या आपल्या सेवा कारकिर्दीत, एअर मार्शलने महत्त्वाच्या कमांड आणि स्टाफच्या नियुक्त्या भाड्याने घेतल्या आहेत. यामध्ये फायटर स्कॉड्रनचे कमांडिंग ऑफिसर, एअरक्राफ्ट अँड सिस्टीम टेस्टिंग एस्टॅब्लिशमेंट (एएसटीई) चे मुख्य चाचणी पायलट, दोन



फ्रंटलाइन एअर बेसचे एअर ऑफिसर कमांडिंग, डायरेक्टर (ऑपरेशनल प्लॅनिंग अँड असेसमेंट ग्रुप), प्रधान संचालक (एएसआर) आणि सहाय्यक हवाई प्रमुख यांचा समावेश आहे. हवाई मुख्यालय (तइ) मधील कर्मचारी (प्रकल्प), कमांडंट -डढए आणि एकात्मिक संरक्षण कर्मचारी उपप्रमुख (डॉक्ट्रीन, संस्था आणि प्रशिक्षण). सध्याच्या नियुक्तीपूर्वी ते एकात्मिक संरक्षण कर्मचारी (ऑपरेशन्स) उपप्रमुख होते.

हवाई अधिकारी 'अति विशिष्ट सेवा पदक' आणि 'विशिष्ट सेवा पदक' प्राप्तकर्ता आहे. एअर मार्शल जितेंद्र मिश्रा हे एअर मार्शल पंकज मोहन सिन्हा यांच्यानंतर ३१ डिसेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले जे ख-ऋ मध्ये ३९ वर्षांहून अधिक विशिष्ट सेवेत आहेत.

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


## थकबाकीमुळे वीज कनेक्शन तोडलेल्या ग्राहकांसाठी

# अभय योजनेला ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ

### थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर होणार कायदेशीर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** – बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना २०२४ ला ग्राहकांच्या मागणीनुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी केले.

राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपल्या नंतर ३१ डिसेंबर पर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्ष्यात घेऊन ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. मात्र ३१ मार्च २०२५ नंतर या योजनेला मुदत वाढ न देण्याचा निर्णय महावितरणने घेतला असुन थकबाकी न




भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यातील ९३८४८ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून १३० कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ५७ कोटी ३६ लाख रुपयांचे व्याज व २ कोटी १२ लाख रुपयांचा विलंब आकार माफ झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रँचायझी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

**असा लाभ घ्या**

संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल पवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीजग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर योग्य पुरावे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल.

# नागपूरचा पालकमंत्री कोण? गडकरींनी सांगितले नाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नागपूर :–** राज्यात अद्याप विविध शहरातील पालकमंत्री कोण होणार याबाबत उत्सुकता असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी एका कार्यक्रमात नागपूरचे पालकमंत्री कोण होणार याबाबत अप्रत्यक्ष सुतोवाच केले. राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागला. महायुतीच्या तीनही घटक पक्षांना प्रचंड बहुमत मिळाल्यावर देखील त्यांच्यात एकवाक्यता न आल्यामुळे आधी मुख्यमंत्री पदाची घोषणा आणि शपथविधी उशीरा झाली. नंतर राज्यातील मंत्र्यांच्या शपथविधीमध्येही बराच काळ गेला. मंत्र्यांना खाती वाटप करतानाही बरीच वाट बघावी लागली. आता निकाल लागल्यानंतर सुमारे दीड महिन्याचा कालावधी उलटला असला तरी राज्यातील विविध जिल्ह्यातील पालकमंत्र्यांची नावांची घोषणा अद्याप झालेली नाही. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबत घोषणा करणार असल्याची चर्चा आहे. मात्र मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिकरित्या घोषणा करण्यापूर्वीच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमादरम्यान नागपूरच्या होणाऱ्या पालकमंत्र्यांचे नाव अप्रत्यक्ष जाहीर करून टाकले. उल्लेखनीय बाब म्हणजे, नागपूरचे पालकमंत्री म्हणून गडकरी यांनी ज्यांच्या नावाची घोषणा केली ते नेते स्वत: त्या कार्यक्रमात उपस्थित होते.

नागपूरच्या कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाच्या तारखांची घोषणा करणाऱ्या समारंभात गडकरी बोलत होते. यावेळी भाषणादरम्यान राज्याचे



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा नावाचा उल्लेख करताना गडकरी यांनी अनावधानाने त्यांचा पालकमंत्री म्हणून उल्लेख केला. बावनकुळे यांचा पालकमंत्री म्हणून उल्लेख झाल्यावर स्वत:ला सावरत गडकरी यांनी लगेच याबाबत अद्याप घोषणा झाली नसल्याचे स्पष्ट केले. पालकमंत्री कोण होणार, याबाबत राज्याचे मुख्यमंत्री घोषणा करणार असल्याचे पुढे त्यांनी सांगितले. बावनकुळे अद्याप पालकमंत्री झाले नसले तरी तेच पालकमंत्री होणार असल्याचेही त्यांनी पुढच्या वाक्यात उपस्थितांना सांगितले. तत्पूर्वी बावनकुळे यांनी नागपूर शहरातील मैदानांचा विकास करण्यासाठी राज्य शासनाकडून शंभर कोटी रुपये निधी आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे फाईल घेऊन जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. बावनकुळे यांच्या या घोषणेचा उल्लेख करत गडकरी यांनी बावनकुळे ताकदवान नेते असल्याचे सांगितले. बावनकुळे यांच्यासाठी काहीही अशक्य नाही असे गडकरी म्हणाले. बावनकुळे पुरुषाला स्त्री तर स्त्रीला पुरुष करण्याची ताकद ठेवतात असे गडकरी यांनी गमतीने बावनकुळे यांचे कौतुक करताना सांगितले.

# तारक्कासह ११ जहाल नक्षल्यांनी शस्त्र ठेवले अन् संविधान हाती घेतले!

## मुख्यमंत्री म्हणाले, संविधान हाच खरा प्रगतीचा मार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२गडचिरोली** – तब्बल ३८ वर्षे नक्षल चळवळीत राहून सदस्य ते दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी सदस्य अशी वाटचाल करत ६६ गुन्हे दाखल असलेल्या जहाल महिला माओवादी नेता व केंद्रीय समिती सदस्य भूपती याची पत्नी विमला चंद्रा सिडाम उर्फ तारा उर्फ वत्सला उर्फ ताराक्का हिच्यासह ११ जणांनी १ जानेवारीला शस्त्र खाली ठेवले व संविधान हाती घेऊन सन्मानाने जीवन जगण्याचा प्रण केला. तीन विभागीय समिती सदस्य, दोन एरिया समिती सदस्य, एक उपकमांडर व चार दलम सदस्य यांचा यात समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या सर्वांचे आत्मसमर्पण झाले.

तारक्कासह विभागीय समिती सदस्य सुरेश बैसागी उउईके उर्फ चैतू उर्फ बोटी, कल्पना गणपती तोर्रेम उर्फ भारती उर्फ मदनी, अर्जुन तानू हिचामी उर्फ सागर उर्फ सुरेश, एरिया कमिटी सदस्य वनिता सुकलु धुर्वे उर्फ सुशीला, सम्मी पांडु मट्टामी उर्फ बंडी, उपकमांडर निशा बोडका हेडो उर्फ शांती, दलम सदस्य श्रुती उलगे हेडो उर्फ मन्ना, शशिकला पत्तीराम धुर्वे उर्फ श्रुती, सोनी सुक्कु मट्टामी,आकाश सोमा पुंगाटी उर्फ वत्ते यांचा आत्मसमर्पण करणाऱ्यांत समावेश आहे. या सर्वांवर सुमारे १ कोटी ३ लाख रुपयांचे बक्षीस होते. आता आत्मसमर्पणानंतर या सर्वांचे शासनाकडून पुनर्वसन होणार आहे. त्यांना केंद्र व राज्य सरकारकडून आर्थिक मदत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या सर्वांना संविधान देऊन सन्मानाने जीवन जगण्याचा संदेश देण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सरत्या वर्षात उत्तर गडचिरोली माओवादापासून मुक्त झाली, लवकरच दक्षिण गडचिरोली सुद्धा होईल. गेल्या ४ वर्षांत एकही युवक किंवा युवती माओवादी चळवळीत सहभागी झाली नाही, ही फार मोठी उपलब्धी आहे. ११ गावांनी नक्षलवाद्यांना बंदी केली आहे. न्याय मिळायचा असेल तर भारतीय संविधानानेच मिळू शकतो, तो माओवादी विचारसरणीने मिळू शकत नाही, हे जनतेला आता पटले आहे. विकासात जिल्हा जसाजसा पुढे जात आहे तसा माओवाद पिछाडीवर जात असल्याचे त्यांनी सांगितले.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सरत्या वर्षात उत्तर गडचिरोली माओवादापासून मुक्त झाली, लवकरच दक्षिण गडचिरोली सुद्धा होईल. गेल्या ४ वर्षांत एकही युवक किंवा युवती माओवादी चळवळीत सहभागी झाली नाही, ही फार मोठी उपलब्धी आहे. ११ गावांनी नक्षलवाद्यांना बंदी केली आहे. न्याय मिळायचा असेल तर भारतीय संविधानानेच मिळू शकतो, तो माओवादी विचारसरणीने मिळू शकत नाही, हे जनतेला आता पटले आहे. विकासात जिल्हा जसाजसा पुढे जात आहे तसा माओवाद पिछाडीवर जात असल्याचे त्यांनी सांगितले.


# नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी साईबाबांना १३ लाखांचा सुवर्णहार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२शिर्डी : –** श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या शिर्डी येथील श्री साईबाबांच्या झोळीत नववर्षाच्या पहिल्याच दिवशी मूळचे जम्मू आणी काश्मीर आणी सध्या शिर्डी येथील रहिवासी असलेल्या श्रीमती टिकू या साईभक्त महिलेच्या परिवाराकडून १३ लाखांचा सुवर्णहार अर्पण केला आहे.



दरम्यान, श्री साईबाबांवर देश विदेशातील लाखो भक्तांची श्रद्धा आहे. याच श्रद्धेपोटी भाविक साईबाबांच्या झोळीत भरभरून दान देत असतात.दि. १ जानेवारी २०२५ रोजी नववर्षाच्या निमित्ताने मुळचे जम्मु काश्मिर येथील परंतू सध्या शिर्डी येथील रहिवाशी साईभक्त श्रीमती बबीता टिकू व परीवार यांनी श्री साईचरणी २०६ ग्रॅम वजनाचा आकर्षक नक्षीकाम असलेला सोन्याचा हार अर्पण केला याची किंमत १३ लाख ३० हजार ३४८ रुपये असून हा सुंदर नक्षिकाम असलेला हार साईबाबांच्या चरणी अर्पण करुन श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला. त्यानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी देणगीदार साईभक्तांचा शाल व श्री साईबाबांची मुर्ती देवून सत्कार केला.यावेळी जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, संरक्षण अधिकारी रोहीदास माळी आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेतील पंचायत विभागातील २४९ अभिलेखांचे वर्गीकरण अद्यावत

### स्वतंत्र खोलीचे सीईओंच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** जिल्हा परिषद अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व विभागांना अभिलेख वर्गीकरण अद्यावत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने पंचायत विभागातील २४९ अभिलेखांचे वर्गीकरण अद्यावत करण्यात आले असुन या अभिलेखाच्या स्वतंत्र खोलीचेसीईओ संजिता महापात्र यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

जिल्हा परिषदेमध्ये सर्वच विभागांना अभिलेख वर्गीकरण अद्यावत करणे गरजेचे आहे. इतर विभागामध्ये तशी सुविधा असतांना मात्र पंचायत विभागामध्ये याकरीता स्वतंर्त्य जागा नसल्याने अभिलेख वर्गीकरण करणे शक्य नव्हते. याची दखल घेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस यांनी याकरीता जिल्हा परिषदेतील जागा निश्चित करीत अभिलेखाकरीता स्वतंत्र खोली तयार करण्याचे आदेश दिले होते. बुधवारी वर्षाच्या पहील्याच दिवशी या खोलीचे उद्घाटनकरण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस, संजय येऊतकर यांच्या मार्गदर्शनात विभागांतर्गत सर्व आस्थापनांचे तथा सर्व अभिलेखांचे वर्गीकरण अद्यावत करण्यात आलेले आहे. यावेळी सीईओ संजीता महापात्र, सहायक प्रशासन अधिकारी संजय राठी, सामान्य प्रशासन विभागाचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाणे, पंचायत विभागाच्या कनिष्ठ प्रशासन अधिकारी ममता वजीर, पंचायत

## ‘आरटीई’तील शाळा नोंदणीला

# शनिवारपर्यंत मुदतवाढ

### ९१ शाळांच्या नोंदणीला चार दिवसांची डेडलाइन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती :** आरटीई प्रवेशप्रक्रियेत शाळानोंदणीच्या पहिल्या टप्प्याला शासनाकडून ४ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे शाळांना ४ जानेवारीपर्यंत आरटीई प्रक्रियेत नोंदणी करता येणार आहे. आतापर्यंत १४८ शाळांची नोंदणी झाली असुन उर्वरित ९१ शाळांना नोंदणीकरीता चार दिवसांची डेडलाइन देण्यात आली आहे.

आरटीईच्या सन २०२५-२६ शैक्षणिक सत्राकरिता डिसेंबरपासूनच प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात शाळा नोंदणी प्रक्रिया राबविली जात असुन १८ ते ३१ डिसेंबरपर्यंत शाळा नोंदणीचा कार्यक्रम शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यातआला होता. ३१ डिसेंबरपर्यंत शेवटच्या दिवशी केवळ १४८ शाळांनी नोंदणी केली होती. अद्यापही सुमारे ८४ शाळांची नोंदणी शिल्लक असल्याने जिल्हास्तरावर या प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी होत होती. अखेर मंगळवारी रात्री उशीरा शाळा नोंदणीच्या मुदतवाढीचे आदेश धडकले. शाळा नोंदणीला १ ते ते ४ जानेवारीपर्यंत चार दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्यस्थितीत १४८ शाळांची नोंदणी झाली असून अद्यापही ९१ शाळांची नोंदणी शिल्लक आहे. त्यामुळे या ९१ शाळांपैकी किती शाळा आरटीईमध्ये नोंदणी करतात. याकडे लक्ष लागले आहे. मागीलवर्षी २३० शाळांची नोंदणी झाली होती. या चार दिवसांत शाळा नोंदणी न झाल्यास पुन्हा एकदा मुदतवाढ मिळण्याची देखील शक्यता आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड करणारा सायबर सेलच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नागपूर –** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वादग्रस्त व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड केल्याप्रकरणी महाराष्ट्र सायबर सेलने वरद तुकाराम कणकी या संशयिताला ताब्यात घेतले आहे. याचबरोबर सायबर सेलला आणखी एक संशयित पद्माकर आंबोळकर याची ओळख पटली असून, त्यालाही चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. हे दोन्ही संशयित मुंबईतील वरळी भागातील आहेत. सायबर सेल त्यांची राजकीय पार्श्वभूमी आणि इतर संभाव्य संशयितांची चौकशी करत आहे.

दरम्यान या प्रकरणात आधीच एफआयआर दाखल करण्यात आला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा छेडछाड केलेला आणि अपूर्ण व्हिडिओ शेअर केल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य सायबर विभागाने गेल्या आठवड्या १२ सोशल मीडिया युजर्सविरोधात गुन्हा दाखल केला होता. सायबर सेलच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, व्हिडिओचा कंटेंट सामाजिक अशांतता भडकवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला होती. यामुळे विशिष्ट गटांच्या भावना दुखावल्यास महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती बिघडू शकते. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले होते.

महाराष्ट्र सायबर सेलच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, एक्स, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यूट्युब सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ अपलोड करण्यात आला होता. याबाबत त्यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. भाजपाच्या एका प्रतिनिधीने आरोप केला आहे की, हा व्हिडिओ १२ सोशल मीडिया युजर्सच्या खात्यांवरून पोस्ट करण्यात आला होता. यामध्ये भारत भावला शिंदे, शुद्धोधन सहजराव, नागपूर कॉंग्रेस सेवादल, सौरभ सिंग चौहान, मुकेश लव्हाळे, प्रसाद साळवी, वरद कणकी, अमोल कांबळे, सय्यद सलीम, द स्मार्ट २३० के आणि विष्णू भोटकर या सोशल मीडिया खात्यांचा समावेश आहे.

# आरोग्य केंद्रांना बुरशी लागलेल्या औषधीचा पुरवठा

## अमरावती येथील पुरवठादार कंपनी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२यवतमाळ : –** राज्यात सरकारी पुरवठादार असलेल्या औषधी कंपन्यांकडून गुणवत्ता नसलेली औषधी पुरविण्यात येत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. नागपूर त्यानंतर बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात असा प्रकार उघडकीस आला. लाखो रुग्णांना ही औषधी देण्यात आली. त्यानंतर आता यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरविण्यात आलेल्या कॅल्शियम सिरपला बुरशी लागल्याचे उघड झाले आहे. याबाबत वरिष्ठांना माहिती देण्यात आली आहे.

जिल्हास्तरावर जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून औषधी वितरण केले जाते. शासनस्तरावरून निश्चित करण्यात आलेल्या पुरवठादार कंपन्या ही औषधी देतात. अपवादात्मक परिस्थिती स्थानिक पातळीवर खरेदीचा निर्णय होतो. पुरवठादार कंपनीने दिलेली औषधी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व तेथून प्राथमिक आरोग्य केंद्रावर देण्यात येतात. ग्रामीण भागात महिला व मुलांमध्ये तसेच वृद्धांमध्ये कॅल्शियमची कमतरता आढळून येते. यासाठी त्यांना गोळी व सिरपच्या माध्यमातून कॅल्शियम देण्यात येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रांना ग्लायसीकॅल–बी १२ हे सिरप पाठविण्यात आले. ग्लासीअर फार्मास्युटिकल्स प्रा.लि. अमरावती या कंपनीकडून हे सिरप पुरविण्यात आले. या सीलबंद औषधाला बुरशी लागल्याचे निदर्शनास आले. या सिरपचा बॅच क्र. क्यूएल ०६०१, क्यूएल ०६०३ असा आहे. ६ जून २०२४ मध्ये हे औषध तयार झाले असून याची एक्सपायरी मे २०२६ पर्यंत आहे. ३२९ सीलबंद बॉटल्स बुरशी लागलेल्या अवस्थेत आढळून आल्या. जिल्ह्यातील खैरगाव प्राथमिक आरोग्य केंद्र, सावरगाव (ता. कळंब), अकोला बाजार (ता. यवतमाळ), घारफळ (ता. बाभूळगाव) या प्राथमिक आरोग्य केंद्रांवर हा प्रकार निदर्शनास आला आहे. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणाची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांना दिली आहे. याबाबत अजून चौकशी झालेली नाही. या बॅचचे सिरप इतर कुठल्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर, उपकेंद्रावर पोहोचले आहे का, याचीही चौकशी होणे गरजेचे झाले आहे.

### तीन आरोग्य केंद्रांकडून अहवाल: औषधांचे 'एफडीए'कडे नमुने

**'त्या' औषधांचे 'एफडीए'कडे नमुने**

प्राथमिक आरोग्य केंद्रांवर बुरशी आढळून आलेल्या कॅल्शियम सिरपचा पुरवठा थांबविण्यात आला आहे. याबाबतच्या सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालया–कडून देण्यात आल्या आहेत. जुलै महिन्यात या औषधांचा पुरवठा झाला होता. अन्न व औषधी प्रशासन विभागाने या सिरपचे नमुने घेतले आहेत. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर कारवाई होईल.

## तापी मेगा रिचार्ज योजना लवकरच अस्तित्वात येणार !




विदर्भ प्रजासत्ताकदि.२ धारणी : ७राज्य विधानसभा निवडणूक संपली. मेळघाटात 'न भूतो न भविष्यती' अशी लाखांच्या वर बहुमताने भाजप उमेदवाराने विजय मिळविला. या सर्व प्रक्रिया संपुष्टात येताच तापी मेगा रिचार्ज योजना लवकरच साकारणार असल्याचे वृत्त समाजमाध्यमांवर पसरले आणि आता आपले काय होणार, या चर्चेला उधाण आले आहे. मेळघाटासाठी ही सरत्या वर्षातील सर्वात मोठी घटना म्हणावी लागेल.

तापी ही मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील सीमा म्हणून ओळख करून देणारी परिसरातील सर्वात मोठी नदी आहे. अलीकडे महाराष्ट्रातील धारणी तालुका, तर पलीकडे मध्य प्रदेशातील बैतूल, खंडवा आणि बऱ्हाणपूर हे जिल्हे आहेत.मेळघाटातील जनतेच्या दुर्दैव म्हणा किंवा मध्य प्रदेशातील आणि खान्देशातील शेतकऱ्यांचा सुदैव म्हणा, तापी नदीच्या दोन्ही भूभागात भाजपचे आमदार निवडून आले आहेत. बऱ्हाणपूर येथील भाजपच्या आमदार आणि माजी मंत्री अर्चना चिटणीस यांच्यासाठी तापी परियोजना अत्यंत महत्त्वाकांक्षी आहे, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रडारवर आहे.त्यामुळे महाराष्ट्राची निवडणूक संपताच मध्य प्रदेशातील ब–हाणपूर येथे तापी योजनेला खऱ्या अर्थाने गती मिळाली. ही परियोजना धारणी तालुक्यासाठी वरदान ठरणार की अभिशाप हे तर येणारा काळ सांगेल; परंतु सध्या धारणी तालुक्यातील जनता अक्षरशः गोंधळून गेली आहे. पूर्वेकडून वाढत जाणाऱ्या व्याघ्र प्रकल्पाचे जंगल आणि पश्चिमेकडून तापी प्रकल्पाची निर्मिती झाल्यास धारणी तालुक्याचे अस्तित्व संपुष्टात येण्याची भीती आहे. मेळघाटातील नागरिकांना विश्वासात घेतले जात नसल्याची खदखद उमटत आहे. योजनेचे निर्माणकार्य सुरू होण्याचे संकेत मिळाल्याबाबत माजी आमदार राजकुमार प्पल यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी २००५ मध्ये आमदार असताना भूमिगत सर्वेक्षणाला विरोध केला होता.

## मनरेगामध्ये ८३ हजार ७०९ हातांना कामे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती : –** जिल्ह्यात मनरेगा अंतर्गत ८३ हजार ७०९ अकुशल मजुरांना ४ हजार ९९७ कामांवर मजुरीची कामे देण्यात आली आहे. धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यांत ६५ हजार ३०५ मजुर कार्यरत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातुन इतर राज्यात मजुरांची निर्यात थांबली आहे.

देशात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल प्रत्येक मजुरांना वर्षातून किमान शंभर दिवस काम देणे गरजेचे आहे. याकरीता जिल्ह्यात मनरेगा विभागाअंतर्गत अकुशल कामगारांना जॉबकार्ड देण्यात आले आहे.

कामाप्रमाणे स्थानिकांना प्रधान्य देत विविध शासकीय कामांवर घेतले जाते. मधल्या काळात कामाअभावी मेळघाटातील हजारोंच्या संख्येने मजुर मजुरीकरीता इतर राज्यात जात होते. परिणामता, त्यांना धोका देखील पत्कारावा लागायचा, याशिवाय त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे नुकसान मोठ्या प्रमाणात व्हायचे, परंतु मनरेगामुळे आता कामांकरीता इतर राज्यात जाणाऱ्या मजुरांचा आकडा नगण्य झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातच या योजनेअंतर्गत मजुरांना अकुशल कामे दिली जात आहे. सद्यास्थिती जिल्ह्यात पांदन रस्ते, तलाव, नाला खोलीकरण, रस्त्यांची कामे, वृक्ष लागवड आदी विविध प्रकारची ४ हजार ९९७ कामे सुरू आहे. या कामांवर ८३ हजार ७०९ मजुरांना कामे देण्यात आली आहे.

यामध्ये चिखलदरा तालुक्यात सर्वाधिक १११९ कामांवर ३८ हजार ७१० मजूर काम करीत आहे. त्या पाठोपाठ धारणीमध्ये देखील ३८७ कामांवर २६ हजार ५९५ मजुरांना कामे देण्यात आली आहे. जिल्ह्यात मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या कामांमुळे मजुरांनी दिलासा व्यक्त केला आहे.

**धारणी, चिखलदऱ्यात सर्वाधिक ६५ हजार अकुशल मजूर**
**तालुकानिहाय काचे त मजुरांची संख्या**

| तालुका | मजूर | कामे |
|---|---|---|
| अचलपूर | ३१७७ | १०६९ |
| अमरावती | १४०९ | २३७ |
| अंजनगाव सुर्जी | ८७० | १४३ |
| भातकुली | ५७८ | १२४ |
| चांदूर रेल्वे | ७०६ | ११७ |
| चांदूरबाजार | १७८७ | ३४९ |
| चिखलदरा | ३८७१० | १११९ |
| दर्यापूर | ७२९ | १८८ |
| धामणगाव रेल्वे | ३७४ | १०१ |
| धारणी | २६५९५ | ३८७ |
| मोर्शी | ३९१३ | ३७० |
| नांदगाव खंडेश्वर | १४६८ | २५० |
| तिवसा | १७४५ | २६६ |
| वरूड | १६४८ | २७७ |
| एकूण | ८३,७०९ | ४९९७ |

## नव वर्षाचे स्वागत करण्यासाठी गेले अन जीव गमावून बसले

### ट्रकची बाईकला धडक ३ युवकांचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२कांडली –** नववर्षाच्या पूर्वसंध्येला आपल्या मित्रांसोबत जात असलेल्या दुचाकीचा भयानक अपघात झाला. यामधील कांडलीतील तीन तरुण मुलांचा दुर्दैवी करूण अंत झाला.परतवाडा ते धारणी मार्गावरील मल्हारा गावाजवळ ३१ डिसेंबरच्या रात्री ९ वाजताच्या सुमारास ही घटना घडली.विवेक कडू (वय २१), विक्रम चव्हाण (वय १५) आणि कुणाल नांदगावकर (वय २१) सर्व रा. कांडली, अशी मृतांची नावे आहेत. हे तिन्ही युवक नवीन यामहा गाडीने जात असताना मल्हारानजीक एमएच २७ बीएक्स ९२९१ या क्रमांकाच्या ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. हा अपघात एवढा भयानक होता की नव्या दुचाकी वाहनाचा अक्षरशः चुराडा झाला. घटनास्थळी विवेक आणि विक्रम या दोघांचा मृत्यू झाला. अपघातस्थळी मोठ्या प्रमाणात बघ्यांची गर्दी झाली होती. तसेच ताबडतोब रुग्णवाहिका बोलवून जखमी कुणाल याला उपजिल्हा रुग्णालय अचलपूर याठिकाणी पाठविण्यात आले. त्यानंतर त्याची प्रकृती खालवल्यामुळे त्याला अमरावतीला पाठवण्यात आले. परंतु उपचारादरम्यान कुणालची सुद्धा प्राणज्योत मालवली. सर्व मुले सर्वसामान्य कुटुंबातील असूनएकुलती एक असणारी मुले एकाच वेळेस निघून गेल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर पसरला. याअपघातातील ट्रक चालकाविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून परतवाडा पोलिसांनी तो ट्रक जप्त केला आहे. दरम्यान बुधवारी (ता. एक) तीनही मुलांच्या मृतदेहाचे वैद्यकीय परिक्षण केल्यानंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## हुक्का पार्लरवर कारवाईचा पहिला गुन्हा११ हुक्का पॉट

### ८ पॅकेज फ्लेव्हर जप्तसीपी स्पेशल स्कॉडची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
सीपी स्पेशल स्कॉडचे प्रमुख पीआय आसाराम चोरले यांची पथकावर नवर्षाच्या पूर्व संध्येला गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील टेक्सस स्मोकिंग शॉप या हुक्का पार्लवर धाडघातली. येथून पोलिसांनी ११ हुक्का पॉट, ८ हुक्का फ्लेव्हरचे पाकीट जप्त केले आहे. सलग सहा तासाच्या कारवाईनंतर मध्यरात्री ३.३० वाजता २०२५ सालच्या पहिला दिवशी आयुक्तालयातील प्रथम गुन्हा दाखल झाला. आशिषकडू (३८) रा, अर्जुन नगर असे गुन्हे दाखलझालेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, आशिष कडू यांनी पुण्यातील नामांकित टेक्सस स्मोकिंगची अमरावतीत एजन्सी घेतली. आशिषने कॅम्प भागात टेक्सस स्मोकिंग पाईन्ट सुरू केला. दुकानाच्या आतील रूममध्ये कॅबीन बनवून ग्राहकाना विविध फ्लेव्हरचा हूक्कापॉट उपलब्ध करून दिल्या जात होता. ३१ डिसेंबरला थट्रीफस्ट च्या बंदोबस्तासाठी सीपी स्पेशल स्कॉडचे प्रमुख पीआय आसाराम चोरमुले हे त्यांच्या पथकातील कॉस्टेबल ईशा खांडे, रणजीत गावंडे, मंगेश लोखंडे, आशिष भेवले, सुरजगाडगे यांच्यासह आयुक्तालयाच्या हद्दीत होते. टेक्सस हुक्का पार्लरची माहिती मिळताच स्पेशल स्कॉडने रात्री ११ वाजताच्या सुमारास तेथे धाड घातली. येथून पोलिसांनी ११ हुक्का पॉट, ८ हुक्का फ्लेव्हरचे पाकीट जप्त केले आहे. सलग सहा तासाच्या कारवाईनंतर मध्यरात्री ३.३० वाजता २०२५ सालच्या पहिला दिवशी आयुक्तालयातील प्रथम गुन्हा दाखल झाला.

## बहीरम यात्रेत आजी माजी आमदारांचे दोन शंकर पट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परतवाडा :** बहिरम यात्रेला शंकरपटाचा इतिहास आहे. अलीकडच्या काळात बच्चू कडू यांनी शंकरपट सुरू केला. यादरम्यान नुकत्याच पार पडलेल्या अचलपूर विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून प्रवीण तायडे निवडून आले. त्यांनीही बहिरममध्ये यंदा यात्रेदरम्यान शंकरपट आयोजित केला, आहे. यामुळे बहिरम यात्रेच्या इतिहासात पहिल्यांदाच दोन शंकरपट होत आहेत.



आ. प्रवीण तायडे यांनी आयोजित केलेला शंकरपट ८ ते १० जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आला असून, ११ लाखांच्या बक्षिसांची लयलूट त्यांनी ठेवली आहे. माजी आमदार बच्चू कडू यांच्याकडून २१ ते २३ जानेवारीला शंकरपट आयोजित करण्यात आला आहे. या शंकरपटात दहा लाख रुपये बक्षिसांची लयलूट केली जाणार आहे. या दोन्ही शंकरपटांना जिल्हाधिकाऱ्यांनी अनुमती दिल्याची सूत्रांची माहिती आहे. हे दोन्ही शंकरपट एकाच जागेवर आयोजित आहेत.



**स्वतंत्र घड्याळ**

वायुवेगाने धावणाऱ्या बैलजोडीची अचूक वेळ नोंदविणे हे घड्याळजीचे काम. बहिरम यात्रेत पहिल्यांदा होऊ घातलेल्या दोन शंकरपटांकरिता दोन स्वतंत्र घड्याळजी बहिरममध्ये येत आहेत. हिंगोली येथील राजाभाऊ मंडाळे हे घड्याळजी बच्चू कडूंद्वारा आयोजित शंकरपटात धावणाऱ्या बैलांची अचूक वेळ नोंदविणार आहेत. आ. प्रवीण तायडे यांच्याकडून आयोजित शंकरपटात धावणाऱ्या बैलांची अचूक वेळ यवतमाळकडील चरण नामक घड्याळजी नोंदविणार आहेत.

# इर्विनच्या परिसरात आता ५० खाटांची आयसीयू इमारत : बांधकामाला सुरुवात

## इमारतीत प्रत्येक आजारासाठीचे वेगवेगळे राहणार आयसीयू विभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता, या ठिकाणी आयसीयू बेडची संख्या वाढवण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. रुग्णालय प्रशासनानेही यासाठी पाठपुरावा केला होता. त्यामुळे इर्विनमध्ये ५० खाटांची आयसीयू इमारत मंजूर केली होती. या इमारतीच्या बांधकामालाही सुरुवात झाली आहे. या आयसीयू इमारतीत प्रत्येक आजारासाठीचे वेगवेगळे आयसीयू विभाग राहणार आहेत. नव्या वर्षात ही इमारत रुग्णांसाठी उभी होणार असून, याचे काम सुरू आहे.



या इमारतीच्या बांधकामासाठी रुग्णालय परिसरातील कर्मचाऱ्यांचे जुने निवासस्थान, आहार विभाग, तसेच स्टोरेज रूम पाडले आहेत. याच ठिकाणी ही इमारत उभी होत आहे. इर्विनमध्ये शेकडो रुग्ण उपचारासाठी येत असतात. यामध्ये अनेक गंभीर रुग्णांना आयसीयूची गरज असते. परंतु, रुग्णालयात केवळ सहा बेडचे आयसीयू विभाग असल्याने अनेक गंभीर रुग्णांना वेळेत आयसीयू बेड उपलब्ध होत नसल्याने त्यांना नागपूर रेफर करण्यात येते. त्यामुळे इर्विनमध्येच रुग्णांना उपचार मिळावे, याकरिता आयसीयू बेडची संख्या वाढवण्याची मागणी होत होती. या मागणीच्या अनुषंगाने रुग्णालय प्रशासनाने आयसीयू बेड वाढवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला होता.

### आरोग्य यंत्रणेत भर

नव्या वर्षात जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेत भर पडणार आहे. इर्विन रुग्णालय परिसरात ५० खाटांची स्वतंत्र आयसीयू इमारत, तसेच ५० बेडचा स्त्री प्रसूती विभाग, यासह २० खाटांचे आणखी आयसीयू विभाग निर्माण होत आहे. याचे काम पूर्णत्वास आले आहे.

**दिलीप सौंदळे, जिल्हा शल्यचिकित्सक.**

**सुपरमध्ये सुरू होणार ‘हायग्रेड कार्डियाक कॅथ लॅब’**

सुपर स्पेशालिटीत एका महिन्यात दुसरी ‘हायग्रेड कार्डियाक कॅथ लॅब’ सुरू होणार असल्यामुळे जिल्ह्यातील हृदयरुग्णांना आता बाहेर जावे लागणार नाही. यासाठी राज्य शासनाने १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, मंजुरीचे पत्र सुपर स्पेशालिटी अमरावतीकडे पाठवले आहे. पेसमेकर, इम्लांट, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी हायग्रेड कार्डियाक कॅथ लॅबमध्ये होणार असल्याने जिल्ह्यातील किंवा रुग्णालयात येणाऱ्या कोणत्याही हृदयरुग्णाला नागपूर, पुणे, मुंबईत रेफर करावे लागणार नाही.

**५० खाटांच्या स्त्री प्रसूती विभाग अंतिम टप्प्यात**

इर्विनची इमारत ही सात वर्षांसाठी जीएमसी प्रशासनाच्या ताब्यात गेली आहे. त्यामुळे येथे २० खाटांचे आयसीयू विभागाचे काम सुरू आहे. वॉर्ड क्रमांक ८ मध्ये हा २० बेड्चा विभाग आहे. तसेच येथे ५० खाटांचा स्त्री प्रसूती व बालरोग विभागही नव्याने उभारण्यात येत आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

# भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त अनुयायांची शूरवीरांना मानवंदना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त जिल्हाभरातून आलेल्या अनुयायांनी विजयस्तंभाला सायन्सकोर मैदानावर बुधवारी १ जानेवारीला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास मानवंदना दिली. समता सैनिक दल, माजी सैनिक संघटना, भीमा कोरेगांव विजयस्तंभ प्रतिकृती मानवंदना आयोजन समितीद्वारे मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम आयोजित करण्याचे हे १४ वे वर्ष असल्याची माहिती मुख्य आयोजक कैलाश मोरे यांनी दिली.सर्वप्रथम ३० माजी सैनिकांनी दुचाकी व खुल्या जीपमध्ये पुष्पचक्र आणून विजयस्तंभाला सलामी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाने मानवंदना दिली. या वेळी उपस्थित सर्व जागेवर उभे राहिले. संविधान अमृत महोत्सवाचेही या वेळी आयोजन केले होते. विचारपीठावरील मान्यवरांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. मल्लखांबवर या वेळी रोमांचक कसरती दाखवल्या. या सोहळ्याला १८१८ च्या लढाईचे सरसेनापती सिद्धनाथ यांचे बारावे वंशज मिलिंद इनामदार विशेष आकर्षण राहणार आहेत. भदंत ज्ञानज्योती महास्थवीर यांनी बौद्ध उपासक-उपासिकांना धम्मदेशनादिली. गुरुवारी २ जानेवारीला सायंकाळी पाच वाजता समाज भूषण गौरव पुरस्कारांचे वितरण, शुक्रवारी ३ जानेवारीला सकाळी नऊ वाजता सावित्रीबाई फुले जयंती सोहळा आयोजित केला आहे. यंदाचा सोहळा संविधान अमृत महोत्सवी साजरा करणार असल्याने एकाच वेळी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करणार असून, याची नोंद लिमका बुकमध्ये घेणार असल्याचे आयोजकांनी सांगितलेकार्यक्रमासाठी स्थापन समित्यांमध्ये जयश्री मोंढे, रुपाली थोरात, रुपाली पळसपगार, माधुरी चक्रे, सुषमा जामनिक, आशा गवई, अनिता गायकवाड, वंदना ढोणे, स्मिता वरठे, रमेश कटके, बाळासाहेब पवार, मनोहर तायडे, आर.जी. नितनवरे, डी.जी. रंगारी, शीतल नागदिवे, राष्ट्रपाल ठवरे, अनिल बागडे, मंदाकिनी बागडे, ताई गायकवाड, सुधीर तायडे, कैलाश गजभिये, परमेश्वर वरठे यांचा समावेश आहे.

# एक लाखापेक्षा अधिक भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन

## रात्री बारा वाजेपासून भाविकांची मंदिरात गर्दी, नववर्षानिमित्त संस्थानचे उत्कृष्ट नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२शेगाव**

अगाध महिमा शेगावाचा, काय तो वाचा कळेल, येथे दर्शना मुक्त होती, जे या देखती गजानना, न लगे दुजे तपसाधन, घडता गजाननाचे दर्शन, गोविंद म्हणे भूमीवर क्षेत्र हे पंढरी शेगाव या अमृतमय वचनामृताचा क्षणोक्षणी प्रत्यय आज शेगावात आला.

नवीन वर्षाची सुरुवात श्रींच्या दर्शनाने करण्यासाठी लाखो भाविकांची मांदियाळी पौष शु. २ नवीन वर्षाच्या प्रथम दिनी पाहायला मिळाली. सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत श्रींच्या दर्शनाने करण्याच्या इच्छेने भाविकांचा मेळा विदर्भाची प्रति पंढरी व महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे भक्तिमय वातावरणात मंत्रजाप करत ओम गजानन नमो नमः श्री गजानन नमो नमः जय गजानन नमो नमः, अनंत कोटी ब्रम्हांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रह्म सच्चिदानंद भक्त प्रति पालक शेगाव निवासी समर्थ सद्गुरु श्री दर्शनासाठी भाविकांनी केलेली गर्दी.गजानन महाराज की जय करीत भाविकांनी श्रींच्या समाधीचे दर्शन घेत नवीन वर्षाचे स्वागत केले.



### रात्रभर मंदिर सुरू; भाविकांची गैरसोय होणार नाही याची काळजी

यंदा नववर्षाची सुरुवात गजानन महाराजांच्या दर्शनाने करण्यासाठी एक लाख भाविकांचे शेगावात आगमन झाले. भक्तांची गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनाने दर्शनाच्या वेळेत बदल केला आहे. संत गजानन महाराज मंदिर ३१ डिसेंबर रोजी भक्तांना दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात आले होते. तसेच १ जानेवारीला सलगसुरूच ठेवण्यात आले होते. भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी मंदिर प्रशासन घेत आहे. दरम्यान आज १ जानेवारी पहाटेपासून बुलडाणा जिल्ह्यासह विदर्भ आणि राज्यातून लाखो भाविक मिळेल त्या वाहनांनी शेगावात दाखल झाले. रात्री मुक्कामी असणाऱ्या भाविकानी पहाटेच श्रींचे दर्शन घेतले.

नववर्षाचे स्वागत करण्यासाठी एक लाखाच्या जवळपास भाविकांनी संतनगरी शेगावात एकच गर्दी केली होती. विदर्भ,मराठवाडा, कोकण, मुंबई, पुणे, पश्चिम महाराष्ट्रासह इतर राज्यातील लाखो भाविकांनी आज १ जानेवारी रोजी नवीन वर्षाच्या प्रथम दिनी श्री संत गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन दर्शन घेतले. भक्तांचे माहेर, सर्व सुखाचे भांडारअसलेल्या शेगावात श्रींच्या समाधी दर्शनाने नवीन वर्षाची सुरुवात श्रींच्या आशीर्वादाने केली. त्याचप्रमाणे असंख्य भाविकांनी श्री दास गणू महाराज लिखित श्री गजानन विजय ग्रंथाच्या २९ अध्यायाचे वाचन करून पारायण केले.

### परिसरातील व्यावसायिकांनी केली लाखोंची उलाढाल

शहरात गेल्या सात दिवसांपासून भाविकांच्या गर्दीमुळे शहरातील लहान मोठे व्यावसायिकांकडून भाविकांनी हार, फुल, पेंढा व खेळणे यासह अष्टगंध, बुक्का, टाळ असे विविध वस्तूंची खरेदी भाविक करत असतात. त्यामुळे येथील व्यावसायिकांची चांगलीच उलाढाल झाली आहे.

# एकताईसह पाच गावे एक महिन्यापासून अंधारात

## मेळघाटातले वास्तव, आदिवासींची व्यथा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चिखलदरा**

मेळघाटातील दुर्गम भागातील गावे अजूनही शासनाकडून दुर्लक्षित आहेत. या भागात रस्त्यांचा प्रश्न आहेच. सोबतच विजेचा सुद्धा मोठा प्रश्न आहे. नेहमीच कमी दाबाची वीज राहते. कधी कधी बंदही राहते. परंतु, मागील एक महिन्यापासून या भागातील पाच गावांची वीज चक्क बंद असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

एक महिन्यापासून वीज बंद असल्याने गावातील नागरिकांना बराच अडचणींना सामना करावा लागत आहे. या गावातील सर्व उपकरणे बंद आहेत. लाईटपासून तर पीठ गिरणीपर्यंतची! संपर्काची साधने सुद्धा बंद पडली आहेत.



त्यामुळे या भागातील नागरिकांना जगणे कठीण झाले आहे. शहरामध्ये अर्धातास लाईन बंद असली तर नागरिक ऑफिसपर्यंत पोहोचतात. परंतु, या भागातील पाच गावांमध्येमागील एक महिन्यापासून लाईट बंद असल्यामुळे काय हाल होत असतील याची कल्पना केलेलीच बरी. एकताई, सलिता, सुमीता, खुटीदा, भांडूम या गावांमध्ये मागील एक महिन्यापासून वीज बंद आहे.

**शासन व प्रशासनाचे दुर्लक्ष**

आमच्या एकताई ग्रामपंचायत मधील गावांमध्ये एका महिन्यापासून वीज नाही. सलिता, भांडूम, एकताई, सुमीता, खुटीदा या गावे अंधारात आहेत. आमच्याकडे शासन व प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, अशी प्रतिक्रिया एकताईचे सरपंच बाली लालाजी धिकार यांनी दिली.

**वीज उपक्रेंदाची आवश्यकता**

या भागाची लाईन केबल वरुन टाकली आहे. त्यामुळे होल्टेज पुरत नाही. वारंवार बिघाड होतो. तरी आज सायकांळपर्यंत किंवा उद्यापर्यंत आम्ही वीज पुरवठा सुरू करण्याचा प्रयत्न करत आहोत. जारिदा येथे वीज उपक्रेंद चालू होणे गरजेचे आहे. त्याशिवाय इकडच्या समस्या सुटणार नाही, अशी माहिती एका अधिकार्याने नाव प्रकाशित न करण्याच्या अटीवर दिली.

# अंतिम पैसेवारी आली ४८; जिल्ह्यात दुष्काळ निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२यवतमाळ**

यंदाचे वर्ष जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अस्मानी संकटांनी कंबरडे मोडणारे वर्ष ठरले. त्यामुळे शेतकरी पुर्णपणे हवालदिल झाला आहे. त्यातच जिल्ह्यात नजरअंदाज पैसेवारी आणि सुधारीत पैसेवारी जाहीर करताना पिकस्थीती ठिकच दर्शवण्यात



आली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र मंगळवारी दि. ३१ डिसेंबर रोजी जाहीर झालेल्या जिल्ह्याच्या अंतीम पैसेवारीमध्ये खरी परिस्थिती पुढे आली आहे.

अंतीम पैसेवारी ४८ इतकी जाहीर झाली असल्याने जिल्ह्यात दुष्काळपरिस्थिती होती हे निश्चित झाले आहे. पिकांचे भाव पडल्याने शेतकरी चारही बाजूने घेरला गेला आहे. यंदा ३० सप्टेंबरला जिल्ह्याची नजरअंदाज पैसेवारी जाहीर झाली. जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये नुकसान झाले.

**तालुका – पैसेवारी**

यवतमाळ – ४७, कळंब-४८, बाभूळगाव ४८, आर्णी – ४८ दारव्हा – ४७, दिग्रस – ४९ नेर-४७ पुसद ४९, उमरखेड – ४८ महागाव – ४७, केळापूर – ४९ घाटंजी – ४८, राळेगाव – ४८ वणी ४९, मारेगाव – ४८ झरी जामणी-४९, एकूण-४८

# नव्या वर्षात रक्तदान महायज्ञाला थाटात प्रारंभ

## खासदार डॉ. अनिल बोंडे यांची संकल्पना पहिल्याच दिवशी भव्य रक्तदान शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

रक्ताविना कोणत्याही रुग्णाची वाताहत होऊ नये, रक्तदान हेच श्रेष्ठदान, रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा याला केंद्रबिंदू मानत नूतन वर्षापासून खा. अनिल बोंडे यांच्या संकल्पनेतून रक्तदानाच्या महायज्ञाला थाटात सुरुवात झाली आहे. राजापेठ येथील दंडे प्लॉट येथे मनाली बोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज भव्य रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. नूतन वर्षापासून सुरू झालेली ही मोहीम पुढे वर्षभर ३६५ दिवस सतत चालणार आहे. यातून गोळा होणारे रक्त हे जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीला दिले जाणार आहे.

भाजप जिल्हाध्यक्ष तथा राज्यसभा खा. बोंडे यांच्या संकल्पनेतून व डॉ. वसुधा बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन



केलेल्या खासदार रक्तदान समिती अंतर्गत २०२५ या वर्षात सतत ३६५ दिवस रक्तदान शिबिर विविध ठिकाणी आयोजित केली जाणार आहेत. या मोहिमेचा थाटात प्रारंभ आज खा. बोंडे यांच्या कन्या मनाली यांच्या वाढदिवसा पासून झाला. डॉ. बोंडे हॉस्पिटल परिसरात झालेल्या या शिबिरातून ३० पेक्षा अधिकच्या रक्त पिशव्या गोळा करण्यात आल्या. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीची चमू व हायटेक मल्टीस्पेशालिटी रुग्णालयातील कर्मचार्यांनी त्यासाठी परिश्रम घेतले. डॉ. बोंडे दाम्पत्य व मनाली यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या रक्तदान शिबिराला जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदाळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, मिशन आयएएसचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे, डॉ. दिनेश वाघाडे, डॉ. स्वप्नील शिरभाते, डॉ. अभिजीत देशमुख, ॲड. प्रशांत देशपांडे, मंगेश खोंडे, राजेश अग्रवाल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

शिबिराला यशस्वी करण्यासाठी नितीन गुडधे, डॉ. महेंद्र राऊत, नितीन गुर्जर, मुरली माकोडे, राहुल जाधव, कन्हैया मित्तल, प्रीती तट्टे, वैदही उपासने, मोहन जाजोदिया, रमेश वर्हाडे, भाग्यश्री देशमुख, सत्यजित राठोड, अजिंक्य वानखडे, सुनील सोमवंशी, प्रीतम बुद्धक, गिरीश काळे, धीरज चौधरी यांच्यासह विविध मान्यवरांनी परिश्रम घेतले.

### सरकारी वकिलांनी खटला चालवण्यास नकार का दिला?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ बीड**

संतोष देशमुख हत्या प्रकरण सध्या चांगलेच गाजत आहे. या प्रकरणात काही आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर काही अजूनही फरार आहेत. दरम्यान, हत्येचा हा खटला बीड जिल्ह्याबाहेर चालवण्याची मागणी जोर धरताना दिसत आहे. विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी हा खटला बीड जिल्ह्याबाहेर चालवण्यासह तीन मागण्या राज्य सरकारकडे केल्या आहेत. सरकारी वकिलांनी खटला लढण्यास नकार दिल्याच्या मुद्द्यावरही दानवेंनी शंका उपस्थित केली आहे.

# अचलपूर मतदार संघातील आजी माजी आमदारांचा वाद चिघळला

## भाजप कार्यकर्त्यांचे ग्रामीण पोलीस अधीक्षकांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अचलपूर मतदार संघाचे माजी आमदार बच्चू कडु यांच्या व त्यांच्या गुंडु प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांचा इतिहास पाहता अचलपुर मतदार संघाच्या विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांच्या जिविताची हानी होऊ नये व त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारातुन प्रहारचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार यांच्या आदेशावरुन त्याचे गावगुंड कार्यकर्ते हल्ला किंवा अपघात करण्याची शक्यता टाळता येत नाही म्हणून विद्यमान आमदारांना आपल्या विभागातुन सुरक्षा प्रदान करण्यात यावी अशी मागणी आज अचलपूर येथील भाजप शिष्टमंडळाने ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांना एका निवेदनामार्फत करण्यात आले.

नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीमध्ये अचलपुर विधानसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टी चे अधिकृत उमेदवार प्रविण तायडे हे १२००० च्या वर मताधिक्य घेऊन प्रहारच्या बच्चु कडु, कॉंग्रेस चे बबलु देशमुख यांच्या विरोधात विजय झाले. परंतु प्रहार पक्षाच्या उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांना आपण पराजीत झालो हे पचनी पडत नसल्याने प्रहार पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष माजी आमदार बच्चु कडू गावागावात मतदारांना धमकी व वजा दबाव टाकत आहे व बच्चु कडू यांचे कार्यकर्ते शिवीगाळ व दबाव टाकण्याचे काम करत आहे. तसेच व्हॉट्स अॅप, फेसबुकवर सुध्दा आमदार प्रविण तायडे यांच्याविरोधात शिवीगाळ व अश्लिल भाषेचा वापर करुन त्यांना बदनामी व मानहाणी करीत आहेत. माजी आमदार बच्चु कडु यांचा आतापर्यंतचा इतिहास पाहता त्यांच्याकडे गुंड प्रवृत्तीचे कार्यकर्ते आहे.गेल्या २९, ३० डिसेंबर च्या मध्यरात्री बहिरम यात्रेमध्ये विद्यमान आमदार श्री. प्रविणभाऊ तायडे यांचे यात्रा करणाऱ्या भाविक भक्तांच्या स्वागतासाठी दर्शनी भागात लागलेल्या बॅनरवर थुंकुन काही बॅनर फाडण्याच्या किळसवाणा प्रकार प्रहार कार्यकत्यांनी केला असुन असे प्रकार गेल्या अनेक वर्षापासुन अचलपुर मतदार संघात सुरु आहे. प्रहार पक्षा व्यतिरिक्त दुसऱ्या पक्षाचे बॅनर लागले को प्रहारचे कार्यकर्ते ते बॅनर ब्लेडने फाडण्याचे चे प्रकार झाले आहे. त्यांची तक्रार पोलीस स्टेशनला दाखल आहे तरी आम्ही आपणास माजी आमदार बच्चू कडु यांच्या व त्यांच्या गुंडु प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांचा इतिहास पाहता अचलपुर मतदार संघाच्या विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांच्या जिविताची हानी होऊ नये व त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारातुन प्रहारचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार यांच्या आदेशावरुन त्याचे गावगुंड कार्यकर्ते हल्ला किंवा अपघात करण्याची शक्यता टाळता येत नाही म्हणून विद्यमान आमदारांना आपल्या विभागातुन सुरक्षा प्रदान करण्यात यावी अशी मागणी आज भाजप कार्यकर्त्यांनी केली.यावेळी कुंदन यादव,विशाल काकड,मुरली माकोडे सह शेकडो भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# रस्त्यावरून हजारो वाहने धावतात इन्शुरन्सविना

## नुकसान टाळण्यासाठी इन्शुरन्स करा : लाखाच्या दुचाकीला इन्शुरन्स का नाही?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**




प्रत्येक प्रकारच्या दुचाकीच्या किमती लाखो रुपयांच्या घरात गेल्या आहेत. सुरुवातीला गाडी घेताना केला जाणारा गाडीचा इन्शुरन्स नंतर कधीच काढला जात नाही. यामुळे गाडी चोरीला गेल्यास किंवा अपघात झाल्यास कुठलीच भरपाई मिळत नाही. यासाठी लाखो रुपये खर्च करून त्या वाहनाच्या सुरक्षेसाठी किंवा आपले नुकसान टाळण्यासाठी इन्शुरन्स करणे गरजेचे आहे.

मोटार वाहन कायदा १९८८च्या कलम १४६ व १४७ अनुसार मोटार वाहन विमा काढणे कायद्याने गरजेचे आहे. यात आपलाही फायदा आहे. वाहनाचा इन्शुरन्स असल्यास त्या वाहनाचा अपघात झाल्यास त्यात होणाऱ्या धोक्यापासून आर्थिक संरक्षण मिळते.

कलम १४० मधील तरतुदीनुसार अपघातात कुठलीच चूक नसल्याचा दावा करत कोणतीही व्यक्ती नुकसानभरपाई मागू शकते. कलम १६३ अन्वये धडक देऊन पळून गेलेल्या मोटार वाहनांमुळे झालेल्या अपघातांच्या बाबतीतही भरपाई देण्याची तरतूद आहे.जिल्ह्यातील हजारो दुचाकी वाहने विनाइन्शुरन्स रस्त्यांवर सुसाट धावतात. यामुळे अपघात मोठ्या प्रमाणात घडतात. याकरिता त्यांचा इन्शुरन्स गरजेचा आहे.

**इन्शुरन्स काढणाऱ्यांचे प्रमाण नगण्य**

रस्त्यावर धावणाऱ्या प्रत्येक वाहनाचा इन्शुरन्स असावा. नियमाचा भंग करून विनाइन्शुरन्स वाहन चालविले जात आहे. इन्शुरन्स काढणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे.

मोटार वाहन अपघातासंबंधी दावे प्राप्त करण्यासाठी संबंधित विमा कंपनीकडे तपशीलवार दावा दाखल करावा लागतो. परंतु, इन्शुरन्स नसेल तर दावा करताना अडचणीचे जाते, असे इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी राजेश बंग यांनी सांगितले.

# एमपीएससी परीक्षेची तारीखच बदलली; आता परीक्षा २ फेब्रुवारीला होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

एमपीएससी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. एमपीएससी परिक्षेच्या वयोमर्यादित १ वर्षाचे वाढ करण्यात आली आहे. त्यानंतर आता परीक्षादेखील पुढे ढकलण्यात आल्या आहेत. ५ जानेवारीला होणारी एमपीएससी गट ब परीक्षा २ फेब्रुवारीला होणार आहे. तर २ फेब्रुवारीला होणारी एमपीएससी गट क परीक्षा ४ मे रोजी होणार आहे.MPSC ने विद्यार्थ्यांना वयोमर्यादेत १ वर्षाने वाढ केली आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.वयोमर्यादेमुळे अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना ६ जानेवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे.

एमपीएससी परीक्षेची तारीख बदलल्याने विद्यार्थ्यांना मात्र दिलासा मिळाला आहे. परीक्षेच्या तयारीसाठी वेळदेखील मिळाला आहे. गट ब आणि गट क परीक्षा ही फेब्रुवारी आणि मे महिन्यात होणार आहे.

# अभय योजनेतून नझूल जमीन फ्री होल्ड होणार
## महिन्याच्या दर बुधवारी घेणार शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**



नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्त्वावर दिलेल्या नझुल जमिनी फ्री होल्ड करण्यासाठी (भोगवटादार वर्ग १) विशेष अभय योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत ३१ जुलै २०२५ पर्यंत निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्त्वावर दिलेल्या नझुल जमिनी फ्री होल्ड करण्याकरिता महिन्याच्या दर बुधवारी (शासकीय सुटीचा दिवस वगळून) सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये नागरिकांनी अर्ज दाखल करून विशेष अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे यांनी केले आहे. नागपूर व अमरावती विभागातील नझुल जमिनींच्या भाडेपट्ट्याची नूतनीकरणाविषयी तसेच त्यासंदर्भातील शर्तभंग, वापरात बदल, विनापरवानगी हस्तांतरण इत्यादी विषयाबाबत शासन निर्णय २३ डिसेंबर २०१५ अन्वये सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर निर्णयान्वये नझुल भाडेपट्ट्याचे हस्तांतरण, वापरात बदल, शर्तभंग नियमितीकरणसाठी विहित अनर्जित रकमेचे दर जास्त असल्याने ते दर कमी करण्याबाबत शासनाकडे विविध घटकांकडून केलेल्या मागणीचा विचार करून २३ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयात सुधारणा करून २ मार्च २०१९ रोजी सुधारित शासन निर्णय अन्वये नागपूर व अमरावती विभागातील लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनी फ्री होल्ड करण्याबाबतचा देखील निर्णय घेण्यात आलेला होता. या योजना ३१ जुलै २०२५ पर्यंतच राबविण्यात येणार असून, त्यानंतर २३ डिसेंबर २०१५ व २ मार्च २०१९ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही सुरू राहणार आहे, असे उपविभागीय अधिकारी कारंडे यांनी कळविले आहे.

# १० महिन्यात २०२ विशेष रेल्वेगाड्या रद्द, १ हजार १४६ विशेष गाड्यांना बिलंब

## प्रवाशांना दिलासा मिळण्याऐवजी होतेय गैरसोय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

सणासुदीच्या काळात, उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने रेल्वेतर्फे विशेष गाड्या सुरू करण्यात येतात, पण या गाड्याही मोठ्या प्रमाणात रद्द केल्या जातात आणि अनेक गाड्यांना विलंब होत असल्याची बाब समोर आली आहे.

दरवर्षी दिवाळी, गणोत्सव, दुर्गा पूजा आणि छटपूजा तसेच उन्हाळ्यात रेल्वेकडून विशेष गाड्या सोडल्या जातात. या गाड्या काही विशिष्ट कालावधीसाठी असतात. या गाडीला नियमित गाड्यांपेक्षा अधिक डबे असतात. बहुतांश वेळा या गाडीचे प्रवास भाडे अधिक असते. सणांच्या काळात आणि उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये लाखो लोक आपल्या कुटुंबियांसह आणि



प्रियजनांसह सण साजरा करण्यासाठी आपापल्या घरी परतत असतात. त्यामुळे रेल्वेगाड्यांची मागणी वाढते. नियमित गाड्यांमधून अचानक वाढलेल्या प्रवाशांना सामावून घेणे शक्य नसते. म्हणून ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी रेल्वेतर्फे विशेष गाड्या सोडण्यात येतात. परंतु अनेकदा या गाड्या रद्दही केल्या जातात. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळण्याऐवजी गैरसोय अधिक होत असते.

मध्य रेल्वेने जानेवारी २०२४ मध्ये १४४ विशेष गाड्या सुरू केल्या. त्यापैकी ५५ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्यात आणि १३९ विशेष गाड्यांना विलंब झाला. जून २०२४ मध्ये २०८ विशेष गाड्या सोडण्यात आल्या आणि तब्बल ७६ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या. सप्टेंबर २०२४ मध्ये १५२ विशेष रेल्वेगाड्या सोडण्यात आल्या. त्यापैकी ५३ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या, असा तपशील माहिती अधिकारात प्राप्त झाला आहे.

# चहासाठी कागदी आणि प्लास्टिक कप वापरावर बंदी

## बुलडाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; प्रशासन अलर्ट मोडवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२बुलढाणा**

चहाच्या टपरीवर चहा प्यायला गेल्यावर पूर्वी आपल्याला काचेचे ग्लॅस किंवा काचेच्या कपमध्ये चहा दिला जात होता. पण आता या काचेचे ग्लॅस आणि कपची जागा प्लास्टिक आणि कागदी कपांनी घेतली आहे. यूज अँड थ्रो असलेले हे प्लास्टिक आणि कागदी कप वापरासाठी सोपे असले आणि त्यामुळे आपली मेहनत कमी होत असली तरी देखील हेच कप आपल्या आरोग्यासाठी खूपच घातक आहेत. असामध्ये याच कागदी आणि प्लास्टिक कपांवर बंदी घालण्याचे आदेश बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून



काढण्यात आले आहेत.

कागदी तसंच प्लास्टिक कपावर बंदी घालावी यासाठी आझाद हिंद संघटनेने जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केली होती. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी हे आदेश काढले आहेत. चहाचे कप बनविताना त्यामध्ये बीपीए नावाचे केमिकल वापरले जाते आणि हे केमिकल आरोग्याला हानिकारक असून त्यामुळे कॅन्सरला होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कपांवर बंदी घालण्याची मागणी आझाद हिंद संघटनेकडून करण्यात आली होती.

कागदी प्लास्टिक कप यासह प्लास्टिक वस्तूवर बंदीचा कायदा तर शासन प्रशासनाचे आदेश आहेच तरीही महाराष्ट्रात राजेरोसपणे चहाचे कागदी कप आणि प्लास्टिक द्रोण, पत्रवळ्या, प्लेट्सची विक्री आणि निर्मिती सुरू होती. बीपीए नामक केमिकल वापरणाऱ्या प्लास्टिकमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात कॅन्सर होत आहे. असंख्य नागरिकांचे जीव जात आहे. सदर गंभीर बाबीची दखल घेत आझाद हिंद संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ड सतीशचंद्र रोठे पाटील यांनी शासन प्रशासनासोबत पत्रव्यवहार केला. यासाठी वारंवार आंदोलन करत सातत्याने पाठपुरावा केला.

कागदी कपांचे सत्य जनजागृतीसाठी वास्तविक प्रात्यक्षिक दाखविताना आझाद हिंद शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड सतीशचंद्र रोठे यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. १३ सेकंदाच्या या व्हिडीओला २४ तासांत लाखो व्ह्यूज मिळाले. तर काही नेटकरी, सुज्ञ नागरिकांनी दारू, गुटखा, चहाची पत्ती, दुधाची बॅग, पत्रवाळ्या, खाद्यपदार्थ पॅकिंग प्लास्टिक या अनुषंगानेही कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# महाआरती सह १११ दिवे लावून शकुंतला रेल्वेचा १११ वा वाढदिवस साजरा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अचलपूर**

साला बाद प्रमाणे २०१८ पासून शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीचे अनोखे वेगवेगळे पण शांतिच्या मार्गाने सरकारचे लक्ष वेधन्या साठी ७ व्या वर्षात ही शकुंतला रेल्वेचा १११ वा वाढ दिवस साजरा करत आज १११ दिवे लावून...संत महंत यांच्या हस्ते श्री गणेश प्रतिमा व भारत माता यांचे पूजन करुण वर्ष २०२५ची सुरुवात केली या वेळी सत्कार मूर्ति आमदार प्रविण तायड़े, कार्यक्रम अध्यक्ष तहसीलदार संजय गरकल, प्रमुख अतिथि मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड, दिनेश मोहोड़ प्राचार्य सिद्धार्थ महाविद्यालय, डेपो मैनेजर जीवन वानखड़े,पूर्व आरएफओ एस.बी.बारखडे,शहर अध्यक्ष कुंदन यादव, सामाजिक कार्यकर्ता प्रविण तोड़गांवकर, संत राममोहन महाराज, आचार्य सुदर्शनजी अयोध्या,रुपेशजी ढेपे, विशाल काकड़, योगेश खानजोडे, राजा धर्माधिकारी, शारदा उइके मंच वर उपस्थित मान्यवर उपस्थित होते.

> आंदोलन तर सर्वच करतात पण प्रशासनला वेठीस धरून, नागरिक यांची सम्पत्ति नष्ट करुण नाही तर कुठेही नागरिक व प्रशासन यांना त्रास न देता...रेल बचाव सत्याग्रह समिति शांति मार्गाने जे आंदोलन करत आहे.. ती प्रेरणा महाराष्ट्र मधे सर्वानी घेतली पाहिजे
>
> **संजय गरकल,**
> **तहसीलदार**

तत्पूर्वी सकाळी ७ वाजता पासून सर्वप्रथम रेलवेस्टेशन अचलपुर येथे शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितिचे राजेश पांडे रेल्वे स्टेशन परिसर संविधान चौक मधील किरण गवई सह युवकानी स्वच्छता अभियान राबविले

ज्या मताने आमदार म्हणून तुम्ही मला निवडून दिले,प्रेम दिले,त्याप्रती मी शकुंतला रेल्वे ब्रॉडगेज प्रति नेहमी प्रयत्नरत राहिल.. व वेळोवेळी पाठ पुरावा करुण मि पण एक सत्याग्रही म्हणून नेहमी मदत करणार....माझ्या मतदार संघचा विकास करणार असा विश्वास आमदार प्रविण तायड़े यांनी यावेळी व्यक्त केला .

# तिवस्याच्या प्रवाशांसाठी थांबणार बस : शिवसेनेच्या आंदोलनाला मोठे यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ कुर्हा**



तिवसा बस स्थानकावरील प्रवाश्यांची होणारी मोठी अडचण आता संपणार असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तिवसा तालुका प्रमुख आणि माजी पं. स. सभापती विलास माहूरे यांनी शिवसेना स्टाईलने केलेल्या आंदोलनाची दखल एस. टी. प्रशासनाला घ्यावीच लागली आहे. तिवस्यांच्या प्रवाशांसाठी बस आता थांबणार आहे.

विलास माहूरे यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या एका शिष्टमंडळाने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ ला लागून असलेल्या तिवसा बस स्थानकावर बस न थांबताच किंवा प्रवाश्यांना बसमध्ये बसवून न घेता तशीच पुढे जाते, अशी तक्रार केली होती. प्रवाशांसाठी अडचणीचा ठरलेला हा मद्दा शिवसनेने लावून धरला. निवेदन देऊन मागणी केली. प्रशासनाने प्रतिसाद न दिल्यास आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. ३० डिसेंबरपर्यंत प्रतिसाद न मिळाल्याने बैठक घेऊन चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार तयारी पूर्ण झाली. आंदोलक रस्त्यावर उतरले.

मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन आंदोलकांच्या सर्व मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले व त्याच दिवसापासून सर्व मागण्या कार्यान्वित झाल्या आहे. एसटीचे अधिकारी बेलसरे, विभागीय नियंत्रक वानखडे, जिवन देशमुख यांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य आंदोलकांना मिळाले. आंदोलनात दिलीप केने, देविदास निकाळजे, शरद वानखडे, जयकांत माहुरे, अनिल कायंडे, नामदेव वानखडे, भीमराव शेंडे, गजानन पाथरे, मनोज काळे, शरद इंगळे यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.